सभापतीस्थानी माननीय सभापती

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

कार्वे (जिल्हा कोल्हापूर) येथील कृष्णा कालव्याच्या पाटात घाण साचल्यामुळे शेती पिकांचे नुकसान झाल्याबाबत

(१) * २४६७४ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री.सय्यद पटेल , श्री. श्रीकांत जोशी , श्री.राजन तेली , मेजर सुधीर सावंत : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कार्वे (जिल्हा कोल्हापूर) येथील कृष्णा कालव्याच्या पाटात साचलेली घाण व पानगळामुळे पाटातील पाणी उलटून परिसरातील सुमारे २०० एकर शेती जलमय होऊन पिकांचे मोठयाप्रमाणात नुकसान झाले असल्याचे माहे जानेवारी, २००७ रोजी वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसान झालेल्या पिकांची नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनमार्फत कोणती तातडीची कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामराजे नाईक निंबाळकर : (१) अंशत: खरे आहे. कार्वे (जि.सातारा) येथील कृष्णा कालव्यावरील कोडोली वितरीकेच्या विमोचकाचे अज्ञात इसमाने कुलूप तोडून दार उघडल्यामुळे वितरीकेच्या वहन क्षमतेपेक्षा जादा पाणी वितरीकेमध्ये गेल्यामुळे पाणी भरावावरुन उलटून कार्वे, जि.सातारा हद्दीतील तीन एकर पीक क्षेत्र व ऊस लागणीसाठी तयार केलेल्या चार एकर क्षेत्रात पाणी साठून राहिले होते.

(२) पाणी साठून राहिलेल्या पीक क्षेत्रातील संबंधितांनी कोणतीही तक्रार केलेली नाही. त्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. कालवा/वितरीकेची नियमित दुरुस्ती देखभालीचे काम यांत्रिकी संघटनेकडून प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. संजय दत्त : ज्या अज्ञात इसमाने वितरिकेच्या विमोचकाचे कुलूप तोडून दार उघडले त्या अज्ञात इसमाचा शोध घेण्यात आला आहे काय ? असल्यास, संबंधित व्यक्ती कोण आहे ? त्या व्यक्ती विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे ? नसल्यास, संबंधित इसमाचा शोध किती दिवसात घेण्यात येईल ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : अज्ञात इसमाविरुध्द लगोलग पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद नोंदली गेली आहे. तपासाचे काम चालू आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, ह्या प्रकारामुळे पिकाचे कोठे फारसे नुकसान झालेले नाही, ही देखील वस्तुस्थिती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनाजी साठे : शेतक-यांची तक्रार नसल्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे छापील उत्तरामध्ये म्हटलेले आहे. आता माननीय मंत्री महोदयांनी, पिकाचे कोठेही नुकसान झालेले नाही, असे उत्तर दिलेले आहे. तेव्हा वितरिकेचे पाणी भरावावरुन गेल्यामुळे ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसान भरपाई देण्यात येईल काय ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : मी आधीच उत्तर दिलेले आहे. एकूण सात एकरामध्ये हे पाणी गेले. त्यापैकी 3 एकर हे पीक क्षेत्र होते आणि उर्वरित 4 एकर हा ऊस लागणीसाठी तयार केलेला भाग होता. वितरिकेच्या विमोचकाचे कुलूप तोडून दार उघडल्यामुळे वितरिकेतील पाणी शेतात गेले. एक दिवस पाणी शेतात होते. प्रत्यक्षात 7 एकरातील कोणत्याही शेतक-याने नुकसान भरपाईची मागणी केलेली नाही. त्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री. भास्कर जाधव : वितरिकेतील पाणी भरावावरुन शेतात गेले होते. अशा प्रकारे किती दिवस हे पाणी शेतात जात होते ? शेतक-यांनी नुकसान भरपाई न मागितल्यामुळे ती देण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असे मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. शेतक-यांनी मागणी न केल्यामुळे शासन त्यांना नुकसान भरपाई देऊ इच्छित नाही की प्रत्यक्षात शेतीचे नुकसान झालेले नाही ? यामध्ये नेमकी वस्तुस्थिती काय आहे ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : या प्रकरणी संबंधित महसूल आणि पाटबंधारे खात्याने प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. शेतक-यांनी नुकसान भरपाईची मागणी केलेली नाही. प्रत्यक्ष पाहणी केलेली असल्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री. श्रीकांत जोशी : माहे जानेवारी 2007 रोजी वा त्या दरम्यान नुकसान झाले आहे काय ? असा प्रश्न विचारलेला आहे. म्हणजे जानेवारी महिन्यामध्ये जादा पाणी वितरिकेमध्ये गेल्यामुळे पाणी भरावावरुन शेतात गेलेले आहे. कालवा/वितरिकेची नियमित दुरुस्ती देखभालीचे काम प्रगतीत आहे, असे छापील उत्तरामध्ये म्हटलेले आहे. मग हा जो प्रकार घडला ते कामाच्या प्रगतीचे लक्षण आहे की अधोगतीचे ? या कालवाच्या दुरुस्तीचे काम कालबध्द कार्यक्रम आखून पूर्ण करणार काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 24674.....

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : छापील उत्तरामध्ये असे नमूद केलेले आहे की, कालवा/वितरिकेची नियमित दुरुस्ती देखभालीचे काम यांत्रिकी संघटनेकडून प्रगतीत आहे. त्या ठिकाणी भरावावरुन पाणी गेल्यामुळे वितरिकेचे फारसे नुकसान झालेले नाही. कालव्यातून वितरण व्यवस्था व्यवस्थित सुरु आहे. त्या ठिकाणी नॉर्मल देखभालीचे काम यांत्रिकी संघटनेकडून होत आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विरोबा स्टॉप ते मौजे करंबळे तर्फे (झोरेवाडी) ते मिरगळवाडी (ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी) या दिड किलोंमीटर लांबीच्या रस्त्याचे माती भरावयाचे काम

(२) * २८४३९ श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री.परशुराम उपरकर , श्री.भास्कर जाधव , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्रीमती मंदा म्हात्रे , मेजर सुधीर सावंत , श्री. संजय दत्त : दिनांक १३ डिसेंबर, २००६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित यादी क्रमांक २० मधील अतारांकित प्रश्न क्रमांक १७७२६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरोबा स्टॉप ते मौजे करंबळे तर्फे (झोरेवाडी) ते मिरगळ वाडी (तालूका संगमेश्वर, जिल्हा रत्नागिरी) या रस्त्याचे रोहयो अंतर्गत जुलै २००१ मध्ये फक्त मातीकाम झाले असून त्या रस्त्यावर अद्याप मोऱ्यांचे व खडीकरणाचे काम झालेले नाही हे खरे आहे काय,

(२) सदर रस्त्याचे काम जून-जूलै या भर पाऊसाच्या महिन्यात झाल्यामुळे तो जागोजागी पूर्णपणे वाहून गेला हे ही खरे आहे काय,

(३) सदर रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामास रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमात सन २००६-२००७ मध्ये प्रस्तावित केले असूनही अद्यापपावेतो त्या रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली नाही हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, सदर रस्त्याच्या कामाला अद्याप सुरुवात केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

(५) उक्त ठिकाणच्या लोकांची रस्त्याची समस्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती विशेष उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : (१) या रस्त्याचे मातीकाम खडीकरण व मोऱ्याचे काम रोजगार हमी योजनेमधून जुलै २००१ मध्ये पूर्ण केले आहे.

(२) वेळोवेळी झालेल्या अतिवृष्टीमुळे काही ठिकाणी रस्ता खराब झाला आहे.

(३), (४) व (५) सन २००६-२००७ मध्ये रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमात या रस्त्याचे काम प्रस्तावित केले असून कामास मंजूरी प्राप्त होताच निधीच्या उपलब्धतेनुसार काम पूर्ण करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, रस्त्याचे मातीकरण व खडीकरणाचे काम पूर्ण झाले असले तरी त्यावर रोलर फिरविलेला नसल्यामुळे टोकदार खडीवरुन ग्रामस्थ व शाळेतील मुलांना चालत जावे लागते. विशेषत: अनवाणी चालणाऱ्या लहान मुलांची खूप अडचण होते. वारंवार ग्रामस्थांनी निवेदने दिली आहेत. या कामासाठी किती तरतूद केली जाणार आहे व किती काळात हे काम सुरु होऊन पूर्ण केले जाईल?

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२८४३९.....

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणतात ती गोष्ट खरी आहे. या वाडीची लोकसंख्या ७८६ इतकी आहे. तेथील ग्रामस्थांना मुख्य रस्त्यावर जाण्यासाठी हाच एक रस्ता उपलब्ध असल्यामुळे अंदाजित मागणी आहे ती ६ मोऱ्यांचे भिंत बांधकाम आणि ३ कि.मी.रस्त्याच्या खडीकरणाच्या नुतनीकरणासाठी ८ ते १० लाख रुपये खर्च येईल. त्या संदर्भातील प्रस्ताव आल्यानंतर तातडीने ते काम मंजूर केले जाईल व तातडीने पावसाळयापूर्वी काम केले जाईल.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी उत्तरामध्ये म्हटले आहे की, वारंवार होणाऱ्या अतिवृष्टीमुळे रस्ता खराब झाला. २००५ या वर्षी १०० वर्षात पडला नाही इतका पाऊस कोकणात पडला. २००५-०६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्ता खराब झाला असेल तर कोकणामध्ये अतिवृष्टीमध्ये जे रस्ते खराब झाले आहेत त्यांचा सर्वेक्षणामध्ये उल्लेख आहे. त्या सर्वेक्षणामध्ये या रस्त्याचा समावेश असेल तर शासनाने रस्ते दुरुस्तीसाठी जे पैसे देऊ केलेले आहेत त्यामधून तात्काळ प्रस्तावाची वाट न पाहता या रस्त्याची दुरुस्ती करण्यात येईल काय?

श्री.हर्षवर्धन पाटील : ३ कि.मी.चा रस्ता आहे. रोहयोमधून खडीकरण व मुरुमीकरणाचे काम घेतले जाते. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, अतिवृष्टीमुळे रस्त्याची दुरावस्था झाली आहे. निश्चितपणे जिल्हयाच्या पालकमंत्र्यांच्या संदर्भात ५-५ कोटी रुपये अतिवृष्टीच्या कामासाठी दिले आहेत. पालकमंत्र्यांशी चर्चा करुन या संदर्भात तशा पध्दतीची सूचना देण्यात येईल.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, रोहयोमधून झालेल्या रस्त्यांची पावसाळ्यामध्ये दुर्दशा होते. निधीअभावी अशा रस्त्यांची दुरुस्ती होत नाही. म्हणून रोहयो अंतर्गत झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी दिला जाईल का? संगमेश्वर तालुक्यामध्ये २००१ साली रोहयोमध्ये भ्रष्टाचार केल्यामुळे तहसीलदाराला निलंबित केले. त्या प्रकरणामध्ये या रस्त्याचा समावेश आहे का?

श्री.हर्षवर्धन पाटील : त्या तहसीलदाराला निलंबित करण्याची जी कारणे होती त्यामध्ये हा रस्ता अंतर्भूत होता का याची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. निश्चितपणे संगमेश्वर तालुक्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी ज्या ज्या ठिकाणच्या प्रस्तावाद्वारे मागणी येईल त्यांना रोहयो माध्यमातून मान्यता देण्यात येईल.

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२८४३९.....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, कोकणामध्ये अतिवृष्टी होते हे मंत्रीमहोदयांना माहिती आहे. पाऊस खूप पडतो, ते पाणी समुद्रामध्ये वाहून जाते. रोहयोअंतर्गत झालेला रस्ता असो किंवा जिल्हा परिषदेच्या माध्यमातून झालेला रस्ता असो, या रस्त्यांचे सर्वेक्षण करुन कोकणातील रस्त्यांसाठी कायमस्वरुपी तोडगा काढणार आहात का? या वर्षी रस्ता तयार केल्यानंतर पुढील वर्षी तो वाहून जातो हे शासनाच्या सर्वेक्षणात आढळून आले आहे. म्हणून यासंबंधी समिती नियुक्त करुन कायमस्वरुपी तोडगा काढला जाईल का?

श्री.हर्षवर्धन पाटील : होय.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, रोहयो अंतर्गत १२०० कोटी रुपये प्रतिवर्षी शासनाकडून खर्च केले जातात. केंद्र शासनाने सुध्दा ही योजना सुरु केलेली असून त्या योजनेमध्ये महाराष्ट्रातील काही जिल्हयांचा समावेश केलेला आहे. त्यामुळे पैसे उपलब्ध आहेत.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 28439 .....

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

सभापती महोदय, सन 2005 मध्ये अतिवृष्टीमुळे कोकणातील सर्व रस्ते खराब झाले होते. रोजगार हमी योजनेअंतर्गत कोकणामध्ये दर वर्षी 5 कोटी रुपयांची कामे केली जातात. कोकणातील रस्त्यांच्या कामासाठी रोहयोअंतर्गत जे 5 कोटी रुपये देण्यात येतात ते खर्च होण्यासाठी 2-4 दिवस सुध्दा लागत नाहीत. रोजगार हमी योजनेत 1200 कोटी रुपये जमा असल्यामुळे कोकणातील रस्त्यांच्या कामासाठी जास्त निधी उपलब्ध करुन देऊन कोकणातील रस्त्यांना न्याय दिला जाणार आहे काय?

श्री. हर्षवर्धन देशमुख : सभापती महोदय, रोजगार हमी योजनेतून डांबरीकरणाचे काम करण्यात येत नाही. यावर्षी रोजगार हमी योजनेत 1200 कोटी रुपये नाही तर 1450 कोटी रुपये प्रोफेशनल टॅक्सच्या रुपाने जमा होणार आहेत. खरे म्हणजे कोकणामध्ये हॉर्टीकल्चरचे काम मोठया प्रमाणात हाती घेतले जाते परंतु रस्त्याची कामे मोठया प्रमाणात हाती घेतली जात नाहीत ही वस्तुस्थिती आहे. कोकणातील रस्त्यांची कामे पूर्ण करण्यासाठी रोजगार हमी योजनेतून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी कोकणाच्या संदर्भात "अतिवृष्टी" असा शब्द वापरलेला आहे. कोकणामध्ये अतिवृष्टी एखाद्या वर्षीच होत असते. कोकणात नेहमी चांगली पर्जन्यवृष्टी होत असते . कोकणामध्ये रस्ते तयार करतांना खडी टाकून त्यावर माती टाकली जाते परंतु लगेच त्या रस्त्यावर रोलर फिरवला जात नसल्यामुळे पाऊस पडल्याबरोबर रस्त्यावरील माती वाहून जाते व खडी मोकळी होते तसेच रत्याच्या कडेचे पाणी रस्त्यावर आल्यामुळे तसेच रस्त्यावरील पाणी वाहून न गेल्यामुळे व ते पाणी तेथेच साचत असल्यामुळे रस्ते खराब होतात. त्यामुळे रस्ते तयार करतांना जे निकष आहेत ते निकष कोकणासाठी तरी बदलण्याची आवश्यकता आहे. कोकणातील रस्त्यांवर दोनदा खडी टाकून माती टाकून ती त्वरित रोलरने दाबली तर पाऊस पडला तरी माती वाहून जाणार नाही व पर्यायाने कोकणातील रस्ते खराब होणार नाहीत. असे जर केले तर कोकणात रस्त्यांच्या कामासाठी जे पैसे खर्च होतात त्या पैशांचा अपहार होणार नाही.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 28439 .....

श्री. हर्षवर्धन देशमुख : सभापती महोदय, रोजगार हमी योजनेत कुशल आणि अकुशल अशी दोन कामे घेतली जातात. रोलरचे काम हे कुशल कामामध्ये येते. रोलर फिरवणे, मुरुम टाकणे तसेच सीडी वर्क ही कामे कुशल कामात येतात. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे कोकणातील रस्त्यांचे कुशल आणि अकुशल अशी दोन्ही प्रकारची कामे बरोबरीने सुरु करण्याच्या संदर्भात सूचना देण्यात येतील तसेच कोकणातील रस्त्यांच्या कामाचे निकष वेगळे करण्याच्या संदर्भात अधीक्षक अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करुन तात्काळ निकषात बदल करुन एस्टिमेट काढण्याच्या संदर्भात प्रस्ताव तयार करण्याबाबत विभागाला सांगण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, कोकणातील या रस्त्याचे काम जून-जुलै या महिन्यात झालेले आहे. वास्तविक पहाता रोजगार हमी योजनेतून या रस्त्याचे काम करीत असतांना संबंधित अधिका-याने आपले डोके, बुध्दी कोठे ठेवली होती याची कल्पना नाही. वास्तविक पहाता कोकणामध्ये जून-जुलै या महिन्यात पाऊस ऐन भरात असतो. या रस्त्याचे काम जून-जुलै मध्ये केल्यामुळे रस्त्यावर टाकलेली खडी आणि माती वाहून गेल्यामुळे या पैशांचा काही एक उपयोग इ ालेला नाही. त्यामुळे या रस्त्याचे काम ज्या संबंधित अधिका-याने केलेले आहे त्या अधिका-यावर आपण काय कारवाई केलेली आहे?

श्री. हर्षवर्धन देशमुख : सभापती महोदय, या रस्त्याचे काम जुलै महिन्यात पूर्ण झालेले आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केलेली आहे असा प्रश्न विचारलेला आहे त्यामुळे संबंधित अधिका-याच्या संदर्भात कारवाई केली जाईल.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रोहा (जिल्हा रायगड) तालुक्यातील अंबाखोरे प्रकल्पाचा कालवा फुटल्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

(३) * २४७७५ श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील अंबाखोरे प्रकल्पाच्या कालव्याला बाळसई नागोठण्याजवळ दिनांक २५ जुलै, २००५ रोजी वा त्या सुमारास मोठया प्रमाणात भेगा गेल्याने कालव्या शेजारी भात पिकाखाली जमीनीमध्ये माती, दगड, रेती वाहून आल्याने संबंधित कुटुंबाचे आर्थिक नुकसान झाले आहे हे खरे आहे काय,

(२) भात पिक जमिनीमध्ये वाहून आलेले माती, दगड, रेती वेळीच न काढल्यामुळे या शेतकऱ्यांना रब्बी हंगामात कडधान्याचे उत्पादन घेता आले नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भात आणि कडधान्य यांचे पीक घेता न आल्यामुळे किती शेतकऱ्यांचे किती रक्कमेचे आर्थिक नुकसान झाले आहे,

(४) आर्थिक नुकसान झाल्याबद्दल संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेंत आलेली आहे काय ?

श्री.रामराजे नाईक निंबाळकर : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) तहसिलदार रोहा यांचेकडील माहितीनुसार १० शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीपोटी रु.९०००/- अदा केलेले आहेत. उर्वरित ४ शेतकऱ्यांपैकी ३ शेतकऱ्यांच्या जमिनीत गवत असल्याने नुकसानभरपाई अनुज्ञेय नाही. तसेच एका शेतकऱ्याच्या नावावर जमीन नाही. मूळ मालकास नुकसानभरपाई देण्यात आलेली आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, उत्तरात म्हटले आहे की, 10 शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. रायगड जिल्हयातील आंबाखोरे प्रकल्पाच्या कालव्याला बाळसई नागोठण्याजवळ दिनांक 25 जुलै, 2005 रोजी वा त्या सुमारास मोठया भेगा गेल्याने तेथील किती शेतक-यांच्या क्षेत्राचे नुकसान झालेले आहे. तसेच या ठिकाणी 9000 रुपये नुकसान भरपाई देण्यात आल्याची माहिती उत्तरात देण्यात आलेली आहे या ठिकाणच्या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याच्या संदर्भात कोणते निकष लावण्यात आले होते?

श्री. रामराजे नाईक निंबाळकर : सभापती महोदय, पंचनाम्यानुसार या ठिकाणी 1.74 हेक्टर क्षेत्राचे नुकसान झालेले आहे. या ठिकाणचे एकूण बाधित क्षेत्र 5 हेक्टरच्या आसपास होते व त्यातीलच हे 1.74 हेक्टर क्षेत्र आहे. 10 शेतक-यांच्या झालेल्या नुकसानीपोटी रु. 9000/- अदा करण्यात आलेले आहेत. उर्वरित 4 शेतक-यांपैकी 3 शेतक-यांच्या जमिनीत गवत असल्याने नुकसानभरपाई अनुज्ञेय नाही. प्रत्यक्षात शेती खात्याने केलेल्या पंचनाम्यात ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, "..... चार शेतकऱ्यांपैकी तीन शेतकऱ्यांच्या जमिनीत गवत असल्याने नुकसान भरपाई अनुज्ञेय नाही." माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, शेतकऱ्याची नेमकी व्याख्या काय आहे ?

श्री.रामराजे नाईक निंबाळकर : सभापती महोदय, 7/12 च्या उताऱ्यावर ज्याचे नाव असेल त्यास आपण शेतकरी असे संबोधितो. एका शेतकऱ्याचे 7/12 च्या उताऱ्यावर नाव नसल्यामुळे त्यास नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, एकूण 14 शेतकऱ्यांचे नुकसान झालेले असून 10 शेतकऱ्यांना 9 हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. उर्वरित चार शेतकऱ्यांपैकी तीन शेतकऱ्यांच्या जमिनीत गवत होते म्हणून त्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही. मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, कोकणात काही जमिनी पडिक ठेवल्या जातात आणि नंतर त्या जमिनीवर पुन्हा पीक घेतले जाते. तेव्हा इतर शेतकऱ्यांबरोबर या तीन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येणार आहे का ?

श्री.रामराजे नाईक निंबाळकर : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील अंबाखोर प्रकल्पाच्या कालव्याला बाळसई नागोठण्याजवळ भेगा पडल्यामुळे कालव्याच्या बाजूच्या शेतीमध्ये माती, दगड, रेती गेल्यामुळे शेतकऱ्यांना भात आणि कडधान्यांचे पीक घेता आले नाही असा प्रश्न विचारण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, शेतात गवत असले तरी त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी. शेतामध्ये गवत असल्यामुळे त्यांना नुकसान भरपाई अनुज्ञेय नाही. तरी सुध्दा या संदर्भात नुकसान भरपाई देण्यात येते किंवा कसे याची पडताळणी करुन त्याबाबत विचार करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,मी स्वत: त्याठिकाणी जाऊन आलेलो आहे. प्रत्यक्षात एकूण 50 हून अधिक शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे आणि फक्त 10 शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. या भागातील शेतकरी वाल, हरभरा, मूग इत्यादी कडधान्यांची पिके घेत होते. परंतु शेतीमध्ये वाहून आलेली माती, दगड व रेती वेळीच न काढल्यामुळे शेतकऱ्यांना ही पिके घेता आली नाहीत हे खरे आहे काय ? तसेच या कालव्याचे पाणी बाळसई, वांगणी, आमडोशी व वरवटणे येथपर्यंत नेण्यात येणार आहे काय ? ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24775.....

श्री.रामराजे नाईक निंबाळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 50 शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. या संदर्भात पडताळणी करुन निर्णय घेण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी वरवटणे पर्यंत पाणी नेण्यात येईल किंवा कसे अशी विचारणा केली आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे स्वरुप वेगळे आहे. तरी सुध्दा ही बाब तपासून घेऊन वरवटणे गावातील शेतकऱ्यांना पाणी देण्याचा शासन निश्चित प्रयत्न करेल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, दिनांक 25 जुलै 2005 रोजी अतिवृष्टी झाली त्यामध्ये अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले. ही घटना घडल्यानंतर शेतकऱ्यांना किती दिवसात नुकसान भरपाई मिळाली ?

श्री.रामराजे नाईक निंबाळकर : सभापती महोदय, दिनांक 25 जुलै 2005 रोजी झालेल्या अतिवृष्टीमध्ये ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यांना डिसेंबर 2005 मध्ये नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे.

अशुद्धीत प्रत / अशुद्धीपत्रक नाही

मुरबाड (जि.ठाणे) तालुकयातील बेडार वाडी व डोबाऱ्याची वाडी या दोन पाणीपुरवठा योजनांचा निधी अध्यक्ष व सचिव यांनी बँकेतून काढून केलेला अपहार

(४) * २८३९४ अॅड. अनिल परब : सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण पाणीपुरवठा प्रश्न तातडीने निकालात काढण्यासाठी नळपाणीपुरवठा योजनाग्राम पाणीपुरवठा समितीमार्फत राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाखो रुपयांच्या पाणीपुरवठा योजना गायब करण्यात आल्याचे निदर्शनास आल्यावरुन ठाणे जिल्हापरिषद प्रशासनाने जिल्ह्यातील मंजूर नळ पाणीपुरवठा योजनांची नुकतीच तपासणी सुरु केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असलयास, मुरबाड तालुक्यातील बेडारवाडी व डोबाऱ्याची वाडी या दोन नळपाणीपुरवठा योजना तयार झाल्या नसतांना संबंधित समिती अध्यक्ष व सचिव यांनी या योजनांचा मंजूर निधी रुपये २१ लाख बँकेतून काढून परस्पर अपहार केला हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या निधिच्या अपहारप्रकरणी सर्व संबंधितांविरुध्द दिनांक २७ डिसेंबर, २००६ रोजी वा त्या दरम्यान मुरबाड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त अपहारप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुसार पुढे अपहारकर्त्यांविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

श्री.रणजित कांबळे, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) होय.

(२) होय.

(३) होय. तथापि, बँकेतून काढलेली रक्कम रु.२१.०० लाख नसून रु.२०,६९,५००/- इतकी आहे.

(४) व (५) सदर प्रकरणी सकृतदर्शनी अपहार केल्याचे निदर्शनास आल्याने सर्व संबंधितांविरुद्ध मुरबाड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक आय/१९९/०६, भादंवि कलम ४०६ व ४२० अंतर्गत दिनांक २८/१२/२००६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून, गुन्ह्याचा तपास चालू आहे.

अॅड.अनिल परब : सभापती महोदय, पाणी पुरवठा योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत केल्यामुळे भ्रष्टाचारास भरपूर वाव मिळालेला आहे. या प्रकरणी अहपार झालेल्याचे उत्तरात मान्य केलेले आहे. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, या निमित्ताने अशाप्रकारच्या ज्या योजना आहेत त्यांची सुध्दा शासनाने तपासणी केली आहे काय ? असल्यास, आतापर्यंत किती योजनांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे आढळून आले? योजनांमध्ये भ्रष्टाचार होऊ नये म्हणून आदेशात फेरदुरुस्ती केली आहे काय ? तसेच यामध्ये ज्या लोकांनी भ्रष्टाचार केला ते राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आहेत काय ?

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, ते कुठल्या पक्षाचे आहेत, याची माहिती सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु काऊंटर चेक करण्यासंबंधीचे आदेश काढण्यात आलेले आहेत. आता यानंतर कुठल्याही प्रकारची रक्कम विड्रॉ करण्यासाठी जिल्हा परिषदेतील पाणी पुरवठा विभागाच्या उप अभियंता आणि कनिष्ठ अभियंत्याच्या सहीनेच रक्कम विड्रॉ करण्यासंबंधीची तरतूद करण्यात आलेली आहे. ज्या योजनांच्या कामांचे पैसे काढले, परंतु कामे केली नाहीत अशा विक्रमगड, नेटारे, भेंडरवाडी व भोमरवाडी या गावातील योजना आहेत. त्या गावांसाठी असलेल्या योजनांचे पैसे विड्रॉ करण्यात आले होते व त्याठिकाणी कोणत्याही प्रकारची कामे केलेली नव्हती. त्यामुळे याबाबतीत संबंधितांवर गुन्हा दाखल करुन पोलीस केस केलेली आहे व त्या गावांमध्ये कामे सुरु केलेली आहेत. सद्य:स्थितीमध्ये त्याठिकाणची जवळपास 90-95 टक्के कामे झालेली आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, याठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "बँकेतून काढलेली रक्कम रुपये 21.00 लाख नसून ती रुपये 20,69,500/- इतकी आहे." तसेच, दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "दिनांक 28.12.2006 रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून गुन्हयाचा तपास चालू आहे." परंतु याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या लेखी उत्तरामध्ये व तोंडी उत्तरामध्ये सद्य:स्थितीचा खुलासा केलेला नाही. तो त्यांनी करावा. तसेच, यामध्ये आरोपी कोण होते ? व त्यांच्यावर पोलिसांनी प्रत्यक्षात कोणत्या स्वरुपाची कारवाई केली ? याबाबतचीही माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावी.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सदर प्रकरणामध्ये दोन्ही ग्रामपंचायतीतील पाणी पुरवठा समितीचे अध्यक्ष आणि सचिव गुंतलेले असून त्यांना दिनांक 28 डिसेंबर,2006 रोजी अटक झाली. त्यानंतर 4 दिवसांनी ते बेलवर सुटले. त्यांची नांवे पुढीलप्रमाणे आहेत. श्री.जयवंत भेंडारी, श्रीमती कमल पोटे, अध्यक्ष व श्री.लक्ष्मण बालू केवाते, श्रीमती कमल मेंगाळ, सचिव अशी त्या चार व्यक्तिची नावे असून त्यांना अटक झालेली आहे. त्यांच्यावर कलम 406 व 420 अंतर्गत गुन्हा दाखल झालेला आहे. या प्रकरणी सद्य:स्थितीत जवळपास 20 लाख रुपयांच्या पाईप लाईनचे व इतर कामे चालू आहेत. या प्रकरणी आरोपींनी तीन महिने पैसे स्वत:कडे ठेवले होते, ज्यावेळी आपण रॅण्डम चेक केला त्यावेळी पैसे विड्रॉ झाले होते, परंतु कामे चालू नव्हती. त्यामुळेच आपण संबंधितांवर ताबडतोबीने कारवाई केलेली आहे. (..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.28394....

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, हा प्रश्न ठाणे जिल्हयांपुरताच मर्यादित नसून ज्या ज्या जिल्हयांत पाणी पुरवठा समित्या आहेत, त्या त्या ठिकाणी अशाप्रकारची स्थिती आहे. ज्या ज्या ठिकाणी पाणी पुरवठा समित्यांतर्गत कामे चालू आहेत, त्या त्या ठिकाणी साधे ग्रामसेवक व समितीवरील लोक टेक्निकल मंजुरी नसतानाही 50-60 लाखांच्या वरील रुपयांची कामे करत आहेत. पाणी पुरवठा योजनांच्या कामांमध्ये जवळपास 50 टक्यांहून अधिक ठिकाणी ॲडव्हांस व येणाऱ्या मूल्यांकनामध्ये तफावत दिसून येते. अशाप्रकारे झालेल्या भ्रष्टाचाराच्या तक्रारी प्रत्येक जिल्हयातून येत आहेत. त्यामुळे याबाबतीत कायद्यात कुठे तरी दुरुस्ती व्हावी की जेणे करुन भविष्यामध्ये असे प्रकार थांबतील. म्हणून माझी शासनास विनंती आहे की, शासन या संदर्भातील नियमांमध्ये दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने पुनर्विचार करणार का ?

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.28394 पुढे सुरु.....</u>

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, जिल्हा परिषदेमार्फत तांत्रिक मंजूरी देण्यात येत असते. तसेच, पहिल्या हप्त्याची रक्कम 75 टक्के नाही तर 45 टक्के देण्यात येत असते. रक्कम अदा करण्यापूर्वी जिल्हा परिषदेच्या उपअभियंत्यांकडून किंवा कनिष्ठ अभियंत्यांकडून कामाची तपासणी होणे आवश्यक आहे, ही पूर्वीची अट या योजनेच्या बाबतीत काढून टाकण्यात आलेली आहे. परंतु, या योजनेत होत असलेला भ्रष्टाचार थांबविण्यासाठी जे काही करणे आवश्यक आहे ते निश्चित करण्यात येईल.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी त्यांच्या लेखी उत्तरामध्ये हे मान्य केले आहे की, रु. 20,69,500/- एवढया रकमेचा भ्रष्टाचार झालेला आहे. कोणत्याही कामाच्या बाबतीत अंदाजपत्रकातील 100 टक्के एवढी रक्कम अगोदर काढून घेण्याची सवलत असता कामा नये. परंतु, अशा प्रकरणांमध्ये 100 टक्के रक्कम अगोदर काढून घेण्याची मुभा असल्यामुळेच भ्रष्टाचार होतो आहे. म्हणून कामाच्या प्रगतीनुसार रक्कम अदा करण्याचे धोरण संबंधित विभागाने स्वीकारले पाहिजे. तसेच, आणखी चार ग्रामपंचायतीमधील पाणी पुरवठा योजनांमध्ये अशाच प्रकारचा भ्रष्टाचार झाल्याचे सन्माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या तोंडी उत्तरात सांगितले आहे. सदर भ्रष्टाचार कधी लक्षात आला व संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी अगोदरच हे स्पष्ट केले आहे की, 100 टक्के रक्कम देण्यात येत नाही तर 45 टक्के रक्कम अगोदर देण्यात येते. प्रस्तुत प्रकरणी पाईपची खरेदी करावयाची असल्यामुळे त्यासाठी 100 टक्के रक्कम द्यावीच लागते. परंतु, यासंदर्भात अधिका-यांकडून काऊंटर चेकिंग झाले पाहिजे, हे मान्य आहे. यासंदर्भात जे पाऊल उचलावे लागेल ते आम्ही उचलू. तसेच, ज्या इतर चार ग्रामपंचायतींच्या पाणी पुरवठा योजनेमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे त्या सगळया प्रकरणात खटले दाखल झालेले आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मुरबाड तालुक्यातील ज्या दोन ग्रामपंचायतींच्या पाणी पुरवठा योजनेमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे त्या प्रकरणी संबंधितांविरुध्द भादंवि कलम 406 व 420 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. भादंवि कलम 406 हे या प्रकरणातील दोषींना

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.28394 पुढे सुरु.....</u>

डॉ.दीपक सावंत.....

दोषमुक्त होण्यास पोषक आहे. संबंधितांना शिक्षा व्हावी असे जर शासनाला वाटत असेल तर भादंवि कलम 406 ऐवजी भादंवि कलम 405 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येईल काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, या प्रकरणी भादंवि कलम 406 बरोबरच भादंवि कलम 420 देखील लावण्यात आलेले आहे. याचा उद्देशच असा आहे की, सदरचे काम पूर्ण व्हावे. तथापि, सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना तपासून पाहण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सदर कामासाठी रक्कम काढण्यापूर्वी जिल्हा परिषदेची तांत्रिक मंजुरी घेण्यात आली होती का ? तसेच, ओव्हरसियरने सदर कामाचे मूल्यांकन केले होते का आणि मूल्यांकन केले असेल तर संबंधित ओव्हरसियरवर शासन कारवाई करणार काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, जिल्हा परिषदेकडून तांत्रिक मंजुरी मिळाल्यानंतर कामाची सर्व जबाबदारी ही पाणी पुरवठा समितीवर असते व ओव्हरसियरकडून मूल्यांकन करुन घेण्याची गरज नसते. हे सर्व अधिकार पाणी पुरवठा समितीला देण्यात आलेले आहेत. त्यामुळे ओव्हरसियरवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

सभापती : सन्माननीय मंत्रीमहोदयांच्या मी लक्षात आणून देऊ इच्छितो की, सन्माननीय सदस्य, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, जयंत प्र.पाटील, डॉ.दीपक सावंत यांनी जे प्रश्न विचारले आहेत त्यामध्ये महत्वाची बाब अशी आहे की, केंद्र शासनाकडून राज्याला पाणी पुरवठा योजनांकरिता कोटयावधी रुपये प्राप्त होतात. राज्य शासनाकडून ग्रामसभेच्या माध्यमातून एक पाणी पुरवठा समिती नियुक्त करण्यात येते आणि या समितीला कामाच्या एकूण रकमेच्या 45 टक्के एवढी रक्कम अगोदर देण्यात येते. इतर योजनांमधील कामाच्या बाबतीत संबंधित कंत्राटदाराला रनिंग बिल करावे लागते आणि मेजरमेंट रेकॉर्ड झाल्यानंतरच रक्कम अदा केली जाते. परंतु, पाणी पुरवठा योजनांच्या कामाच्या बाबतीत मात्र तसे होत नाही. त्यामुळे ग्रामविकास विभागाने याबाबत गांभीर्याने विचार करुन जसे अन्य योजनांच्या बाबतीत ग्रामसेवकाला धनादेश काढावयाचा असेल तर गटविकास अधिकारी तपासणी करतात त्याप्रमाणे कोटयावधी रुपये केंद्र शासनाकडून ज्या योजनांकरिता येतात, त्यातील पै-न-पै या योजनांवरच खर्च होण्याच्या दृष्टीने, याही योजनेच्या

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.28394 पुढे सुरु.....</u>

सभापती.....

बाबतीत गटविकास अधिकारी किंवा उपअभियंता यांचा दाखला घेऊन मगच देयक अदा करण्याच्या दृष्टीने नवीन सुधारणा करावी.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, होय.

यानंतर कुमारी जयश्री.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्र रोजगार हमी योजनेला केंद्राकडून मिळणाऱ्या निधीबाबत

(५) * २४८५६ श्री. श्रीकांत जोशी : सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या निधीतून राबविल्या जाणाऱ्या महाराष्ट्र रोजगार हमी योजनेला मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होऊनही या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होत नसल्याचे दिनांक ७ जानेवारी, २००७ रोजी अथवा त्या सुमारास शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे,

(३) केंद्र शासनाकडून उक्त योजनेसाठी किती निधी प्राप्त झाला आहे व हा निधी विनियोगातून आणून योजनेची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) अद्यापपर्यंत कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : (१) हे खरे नाही,

(२) प्रश्न उद्भवत नाही,

(३) केंद्र शासनाकडून या योजनेसाठी दिनांक २ फेब्रुवारी २००६ पासून ते ३१ जानेवारी, २००७ पर्यंत एकूण रुपये २००.४५ कोटी इतका निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झाला आहे. त्यापैकी जानेवारी, २००७ अखेर रुपये १६७.३३ कोटी खर्च झाला आहे. या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ नुसार महाराष्ट्र रोजगार हमी कायदा १९७७ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, जे छापील उत्तर आले आहे, त्यामध्ये मला माझ्या प्रश्नाph महिती मिळाली नाही. मंत्री महोदयांनी सांगावे की, सन २००६ - २००७ मध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत उत्तर प्रदेशमध्ये ६०४ कोटी रुपये, राजस्थानमध्ये ५१३ कोटी रुपये, आंध्रप्रदेशमध्ये ५१२ कोटी रुपये खर्च करण्यात आले, परंतु महाराष्ट्र राज्यात फक्त १६७ कोटी रुपये खर्च झाले का ? हे खरे आहे काय ? एम.आर.ई.जी.एस. ही केंद्रसरकारची योजना मराठवाडयातील दोन जिल्हयात लागू आहे, त्यानुसार अनुक्रमे २५८ आणि २९०० कोटी रुपये खर्च झाले. बीड जिल्हयात १४८६५, लातूरमध्ये १५,०००,जालना जिल्यामध्ये ८,६११ व बाकीच्या सहा जिल्हयात २००० मजुरांची नोंदणी झालेली आहे. मी पहिला प्रश्न असा विचारला होता की, केंद्र शासनाच्या निधीतून राबविल्या जाणाऱ्या महाराष्ट्र रोजगार हमी योजनेला मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होऊनही या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होत नसल्याचे दिनांक ७ जानेवारी,२००७ रोजी अथवा त्या सुमारास शासनाच्या निदर्शनास आले आहे,हे

G - २.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खरे आहे काय ? माननीय मंत्री महोदयांनी, "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, दिलेले उत्तर बरोबर आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, दिलेले उत्तर हे बरोबर आहे. आपण प्रश्न उपस्थित केला होता की, केंद्र शासनाच्या निधीतून राबविल्या जाणाऱ्या महाराष्ट्र रोजगार हमी योजनेला मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होऊनही या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होत नसल्याचे दिनांक ७ जानेवारी, २००७ रोजी अथवा त्या सुमारास शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ? केंद्राकडून महाराष्ट्र राज्याला एकूण ४८०.४९ एवढी रक्कम प्राप्त झाली. या संपूर्ण रकमेपैकी एम.आर.इ.जी.एस.करिता साधारणत: २४५.४६ कोटी रुपये इतकी रक्कम उपलब्ध झाली. " फुड फॉर वर्क " या योजनेकरिता ८७.७० एवढी रक्कम प्राप्त झाली होती. केंद्राची रोजगार हमी योजना आणि आपल्या राज्याची योजना ही क्लब करण्यात येऊन याकरिता सुमारे १५२.५३ कोटी रुपये महाराष्ट्राकरिता प्राप्त झालेले आहेत. आपल्यापेक्षा इतर राज्यामध्ये सदर योजनेंतर्गत जास्त खर्च झाला कारण आपल्या राज्यातील जी रोजगार हमी योजना आहे, ती इतर राज्यातील रोजगार हमी योजनेपेक्षा " मोअ्र फ्लेक्झिबल " आहे. साधारणत: आपल्या राज्यामध्ये रोजगार हमी योजनेच्या कामाची जास्त मागणी आहे. सुरुवातीला सहा महिने आपल्या राज्यातील रोजगार हमी योजनेकरिता होणारा खर्च हा इतर राज्यातील योजनेपेक्षा कमी होता, ही समाधानकारक गोष्ट नाही, हे मीही मान्य केले होते. ही सर्व यंत्रणा स्टीमलाईन आहे. रोजगार हमी योजनेंतर्गत येणा-या कामांपैकी ५० टक्के कामे ग्रामपंचायतीला वर्ग करण्यात आली आहेत, त्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे काम मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी यांना दिलेले आहे. ५० टक्के काम हे शासकीय एजन्सी मार्फत आपण करीत आहोत. आपण जो औरंगाबाद जिल्हयातील प्रश्न उपस्थित केला तो प्रश्न " डिमांड रिव्हन स्कीम " च्या अंतर्गत येतो. या वर्षी साधारणत: सगळे साखर कारखाने सुरु झाले असल्यामुळे ब-याच ठिकाणाहून मजूरांसाठी मागण्या येतील, त्याप्रमाणे कामे होत आहेत, १२ जिल्हयांमध्ये सदर योजना राबविली जात आहे, हा खर्च करण्यामध्ये कुठल्याही प्रकारची अडचण येणार नाही.

G - ३.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२४८५६.....

श्री.पांडुरंग फुंडकर : रोजगार हमी योजनेचा प्रश्न हा संपूर्ण राज्याच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न आहे. १९७२ पासून रोजगार हमी योजना या राज्यामध्ये सुरु झाली आणि त्यानंतर केंद्रसरकारची ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु झाली. संपूर्ण राज्यभर या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. बुलढाणा जिल्हयामधील लोणारा तालुक्यामध्ये "गांधारी " म्हणून एक ते दीड हजार वस्तीचे एक गाव आहे. या गावातील लोकांनी वारंवार मागणी करुनही त्या ठिकाणी मजुरांना काम उपलब्ध करुन दिले जात नाही. या गावामध्ये वन विभागाचे जे काम आहे ते जर चार रुपयाचे असले तर फॉरेस्ट ऑफिसर त्या कामाचा फक्त एकच रुपया काम करणा-या मजुरांना देतो. गेले सहा महिने तेथील लोक कामाची वारंवार मागणी करीत आहेत, तरीदेखील अद्यापही त्यांना काम देण्यात आलेले नाही.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24856.....

श्री.पांडुरंग फुंडकर .....

मागच्या 3 वर्षापासून त्या गावातील मजूर मुंबईमध्ये काम करण्यासाठी येत आहेत. मुंबईमध्ये काम करीत असतांना भिंत कोळल्यामुळे एकाच गावातील 19 मजूर ठार झाले. हे रोजगार हमी योजनेचे फेल्युअर नाही काय ? गांधारीसारख्या खेडयातील लोकांनी वारंवार मागणी करुन देखील रोजगार हमी योजनेचे काम उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना कामासाठी मुंबईत येऊन आपला जीव गमवावा लागला. राज्यात तालुका स्तरावर अनेक ठिकाणी "मागेल त्याला काम" याप्रमाणे रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी होत नाही, हे खरे आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न एम.आर.ई.जी.एस.चा होता. बुलढाणा जिल्हा एम.आर.ई.जी.एस.मध्ये नाही. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी गांधारी गावातील 19 मजूर मुंबईमध्ये काम करीत असतांना भिंत कोसळल्यामुळे ठार झाले, त्यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो गंभीर आहे. या घटनेसंदर्भात लोणार तालुक्यातील जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी रोहयो, तहसिलदार यांची चौकशी केली जाईल. "मागेल त्याला काम" अशी रोजगार हमी योजनेच्या कायद्यामध्ये तरतूद आहे. परंतु असे होते की, मजूर नमुना क्रमांक 4 भरुन देत नाहीत. फक्त कामाची मागणी करतात. नमुना क्रमांक 4 भरुन दिला तर त्या मजुराला काम देणे संबंधित अधिका-यावर बंधनकारक आहे. अशा प्रकारची घटना घडणार नाही याची काळजी घेतली जाईल आणि या घटनेची चौकशी केली जाईल.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या कायद्याप्रमाणे मागेल त्याला काम दिले पाहिजे. परंतु गोंदिया जिल्हयातील ग्रामसेवकांनी काम करण्यास नकार देऊन आंदोलन केले होते, त्यासंदर्भातील सद्य:स्थिती काय आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघटनेने एम.आर.ई.जी.एस.मधील कामावर बहिष्कार टाकला होता, हे खरे आहे. दिनांक 27.2.2007 रोजी ग्रामसेवक संघटनेबरोबर चर्चा झालेली आहे. आता ग्रामसेवकांनी बहिष्कार मागे घेतला आहे. त्यामुळे आता एम.आर.ई.जी.एस.च्या कामांना ग्रामसेवक संघटनांचा विरोध नाही.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24856.....

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या निमित्ताने बरेच उपप्रश्न उपस्थित होत आहेत. रोजगार हमी योजनेचे पुनर्विलोकन करावयाचे ठरले होते. तसेच केंद्र शासनाची राष्ट्रीय रोजगार हमी योजना आणि महाराष्ट्र सरकारची रोजगार हमी योजना यांचा समन्वय करण्याचे ठरले होते. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या नियमामध्ये कोणते बदल केलेले आहेत ? जेणे करुन मजुरांना लवकर काम मिळेल. तसेच राष्ट्रीय रोजगार हमी योजना आणि रोजगार हमी योजना या दोन्ही योजनांचे मजुरीचे दर सारखेच आहेत काय, या योजनेची अंमलबजावणी करण्यास दिरंगाई होत आहे काय ? वर्षभरापासून हा प्रश्न प्रलंबित आहे. मागच्या अधिवेशनामध्ये सांगण्यात आले होते की, पुनर्विलोकन समितीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. याबाबत माननीय मंत्र्यांनी माहिती द्यावी.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, रोजगार हमी योजनेचे निकष बदलण्यासंदर्भात आणि पुनर्विलोकन समितीच्या अहवालासंदर्भात सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. एम.आर.ई.जी.एस.मध्ये जे मुख्य बदल झालेले आहेत त्यामध्ये 50 टक्के काम ग्रामपंचायतीने करावयाचे आहे आणि 50 टक्के काम सरकारी एजन्सीमार्फत करावयाचे आहे. केंद्र शासनाने मजुरीचा दर 60 रुपये निश्चित केला होता. राज्य मंत्रिमंडळाने असा निर्णय घेतला होता की, केंद्र शासनाचे नोटिफिकेशन ज्या दिवशी काढण्यात येईल त्या दिवसापासून मजुरीचा दर 60 रुपये करण्यात येईल. परंतु आता राज्य शासनाने मजुरीचा दर 66 रुपये निश्चित केलेला आहे. आता एम.आर.ई.जी.एस.चे आणि रोजगार हमी योजनेचे दर महाराष्ट्र राज्यामध्ये सारखेच आहेत. काम मंजूर करण्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या अडचणी येणार नाहीत. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय रोजगार हमी योजनेमध्ये मजुरांना 100 दिवस काम देण्याची हमी देण्यात आलेली आहे. उर्वरित 265 दिवसांचा प्रश्न निर्माण होणार आहे. उर्वरित 265 दिवसांसाठी आपण रोजगार हमी योजना राबविणार आहेत.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर श्री.गागरे .....

ता.प्र.क्र.24856 .....

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने 1977 साली रोजगार हमी योजना सुरु केलेली आहे. त्यानंतर 28 वर्षांनी केंद्र शासनाने महाराष्ट्राच्या धर्तीवर रोजगार हमी योजना आणलेली आहे. मंत्री महोदयांनी 480 कोटी रुपयांची आकडेवारी दिली आहे, त्यामध्ये 200.45 कोटी रुपयांचा निधी केंद्र सरकारकडून प्राप्त झाल्याचे व 167.33 कोटी रुपये खर्च केल्याचे सांगितले आहे. अर्थसंकल्पात रोजगार हमी योजनेसाठी हया रकमेची तरतूद केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने स्वत: या योजनेवर जास्त खर्च न करता केंद्र सरकारकडून जास्तीत जास्त निधी मिळवून तो या योजनेवर खर्च केला पाहिजे. केंद्र सरकारकडून जास्तीत जास्त निधी मिळण्यासाठी राज्य सरकार कोणते प्रयत्न करत आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या निधीतून राबविल्या जाणाऱ्या महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या अनुदानाचा पहिला हप्ता केंद्र सरकारने राज्य सरकारला दिला आहे. राज्य शासनास असे समजले की, केंद्र सरकार अजून अतिरिक्त सहा जिल्हयाचा समावेश या योजनेत करणार आहे. याबाबत ऑफिशियली पत्र अद्याप आले नाही परंतु निश्चित माहिती मिळाली आहे की, अतिरिक्त सहा जिल्हयाचा समावेश रोजगार हमी योजनेत करण्याचे केंद्र सरकारने तत्वत: मान्य केलेले आहे. केंद्र सरकारकडून या योजनेचा दुसरा हप्ता सहाशे कोटी रुपये मिळण्यासाठी राज्य सरकार मागणी करणार आहे. केंद्र शासनाच्या महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या निधीतून जास्तीत जास्त विकास कामे केले जातील. महाराष्ट्राने देशाला रोजगार हमी योजना दिलेली आहे त्यामुळे या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकार कमी पडणार नाही.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, रोजगार हमी योजनेचा मूळ गाभा मंत्री महोदय सांगत नाहीत. जुन्या रोजगार हमी योजनेमध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार करण्याची सोय होती म्हणून प्रशासनाने मोठया प्रमाणावर ही कामे सुरु ठेवली आहेत. केंद्र सरकारची रोजगार हमी योजना आल्यानंतर भ्रष्टाचाराला वाव राहिलेला नाही, म्हणून प्रशासन या योजनेला साथ देत नाही, ही वस्तुस्थिती आहे. केंद्र शासनाच्या रोजगार हमी योजनेतून प्रत्यक्ष ग्रामपंचायतीकडे निधी देण्यात येत आहे, त्याचे कारण मी सांगितलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ SBT/

ता.प्र.क्र.24856

श्री.श्रीकांत जोशी .....

माझा प्रश्न असा आहे की, केंद्राच्या रोजगार हमी योजनेत व राज्याच्या रोजगार हमी योजनेत ज्या त्रुटी आहेत, त्या दूर केल्या पाहिजेत. केंद्र सरकारच्या रोजगार हमी योजनेतून अधिकाधिक खर्च करण्यासाठी महाराष्ट्र शासन नेमकी कोणती कार्यवाही करणार आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र रोजगार हमी योजनेत काही अडचणी आहेत. पूर्वी मस्टर पेमेंट केले जात होते, आता बँक अकौंटमधून पेमेंट केले जात आहे. जेथे बँक नसेल तेथे पोस्ट ऑफिसमधून पेमेंट करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या रोजगार हमी योजनेपेक्षा राज्य सरकारची रोजगार हमी योजना जास्त लवचिक आहे, असे वाटते. गेली अनेक वर्ष राज्य शासनाची रोजगार हमी योजना सुरु आहे. केंद्र सरकारच्या रोजगार हमी योजनेमध्ये बदललेल्या परिस्थितीप्रमाणे 50 टक्के निधी प्रत्यक्ष ग्रामपंचायतीकडे दिला जात आहे. वैयक्तिक लाभाच्या योजना व सिंचनाची व्यवस्था इत्यादी कामे केंद्राच्या राज्य रोजगार हमी योजनेत घेण्याचे आम्ही प्रस्तावित केलेले आहे. याकरिता 7 तारखेला औरंगाबाद, 8 तारखेला नाशिक त्यानंतर अमरावती व 22 तारखेला नागपूर येथे बैठकीचा कार्यक्रम आहे, त्या त्या भागातील व जिल्हयातील सर्व सरपंच सहभागी होणार आहेत. केंद्र सरकार रोजगार हमी योजनेतून निश्चितपणे महाराष्ट्र राज्याला जास्तीत जास्त मदत देईल व त्यातून उत्पादक स्वरुपाची कामे करण्याचा प्रयत्न केला जाईल.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ SBT/

साखर कारखान्यांना शासनाने प्रतीटन २०० रुपये अनुदान देण्याची मागणी

(६) * २८४५८ श्री. सुरेश जेथलिया : सन्माननीय सहकार मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ०१ एप्रिल २००७ नंतरच्या उत्पादनावर मार्च, २००७ पर्यंतच्या सरासरी साखरेच्या उत्पादनाच्या प्रमाणात साखर कारखान्यांना शासनाने घट अनुदान व ऊसांच्या प्रति टनामध्ये २०० रुपयांचे अनुदान द्यावे अशा मागण्या सहकारी साखर कारखानदारांनी शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखर पॅकेजसाठी नाबार्डने लादलेल्या अटी व प्रमाण हे कालबाहय झाल्याने त्याचा फेर आढावा घ्यावा, अशी मागणी साखर कारखान्यांनी शासनाकडे केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या साखर पॅकेजमध्ये उर्वरित बाकी राहिलेल्या साखर कारखान्यांचा समावेश करावा अशी मागणी साखर कारखान्यांनी शासनाकडे केली आहे हे खरे आहे काय,

(४) तसे साखर कारखानदारांनी ऊसांच्या व वाहतूक खर्चालाही अनुदान द्यावे अशी मागणी शासनाकडे केली आहे हे खरे आहे काय,

(५) असल्यास, मागण्यांबाबत शासनाकडून कोणते निर्णय घेण्यात आले आहेत अथवा घेण्याचे प्रस्तावित आहे ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर, डॉ. पतंगराव कदम यांच्याकरिता : (१) अंशत: खरे आहे, राज्यातील अतिरिक्त ऊसाचा प्रश्न सोडविण्याचे दृष्टीकोणातून गाळप हंगाम २००६-२००७ मध्ये १८० दिवसाचे गाळप पूर्ण करणाऱ्या साखर कारखान्यांना दिनांक १६/०४/२००७ नंतर साखर उतारा घट अनुदान व दूर अंतरावरील ऊस आणून गाळप करणेकरीता वाहतूक अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

(२) होय,

(३) होय,

(४) होय,

(५) दिनांक ०१ मार्च, २००७ च्या शासन निर्णयान्वये ऊस वाहतूक अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. विलंबावधीत दिड वर्षाने वाढ करणे. तसेच पॅकेजमध्ये समाविष्ट न झालेल्या साखर कारखान्यांना समाविष्ट करणे या संदर्भात अद्याप निर्णय झालेला नाही.

.....४

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, मराठवाडा आणि विदर्भात ऊसाचा प्रश्न फार गंभीर झालेला आहे. त्याबद्दल शासनाचे धोरण समजलेले नाही. एका साखर कारखान्याने शेतकऱ्यास ठरल्याप्रमाणे ऊसाचा भाव न देता फक्त सहाशे रुपये भाव दिला आहे, त्यामुळे त्याने आत्महत्या केलेली आहे. माझा असा प्रश्न आहे की, शासनाने साखर कारखान्यांना अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे, ते अनुदान केव्हापासून लागू होणार आहे, उर्वरित साखर कारखान्यांचा या पॅकेजमध्ये समावेश करणार काय, वाहतुक अनुदान किती रुपये देणार आहात, या संदर्भात नेमके कोणते निकष लावले जाणार आहेत ?

..... यानंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 28458 .....

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मराठवाडा आणि विदर्भामध्ये अतिरिक्त ऊसाचा थोडासा प्रश्न आहे हे मी जरूर मान्य करतो. परंतु शासनाने त्या दृष्टीने मार्च पासून पावले उचलण्यास सुरूवात केली होती. गेल्या वर्षी महाराष्ट्रात बंद असलेल्या 22 कारखान्यांपैकी 12 कारखाने मराठवाड्यातील असून दोन विदर्भातील आहेत. अतिरिक्त ऊसाचे शासनाच्या पातळवरून वाटप करून जवळपास 30 मे पर्यंत हे कारखाने चालवावेत असे आदेशही शासनाने काढलेले आहेत. 3-4 जिल्ह्यांमध्ये असा अतिरिक्त ऊस आहे आणि त्याचे त्याच जिल्ह्यात वाटप केलेले आहे. त्यानंतर 15 एप्रिल पर्यंत कारखाने चालविले तर तापमान वाढल्याने उताऱ्यामध्ये घट जास्त येते. त्यामुळे 15 एप्रिल ते 30 मे पर्यंतच्या कालावधीमध्ये गाळप चालू ठेवल्यास 15-15 दिवसांच्या टप्प्यांमध्ये उताऱ्यामध्ये घट झाल्यास त्यासाठी अनुदान देण्याचे आपण ठरविले आहे. म्हणजे 15 एप्रिल 30 एप्रिल पर्यंत .5 इतका उतारा कमी झाला तर त्यासाठी 50 रूपये, 1 मे ते 15 मे पर्यंतच्या काळात 1 टक्का घट उताऱ्यामध्ये झाली तर 100 रूपये आणि त्यापुढील काळात 150 रूपये असे साखर उतारा घट अनुदान देण्याचे आपण ठरविले आहे. याप्रमाणे 15 एप्रिल नंतर शासन वितरण आदेशाप्रमाणे जे कारखाने अतिरिक्त ऊसाचे गाळप करतील त्यांना 50 ते 75 कि.मी.पर्यंत, 75 ते 100 कि.मी., 100 ते 125, 125 ते 150 कि.मी. आणि 150 ते 200 कि.मी. पर्यंत काही प्रमाणात वाहतूक अनुदान देण्याचेदेखील शासनाने ठरविले आहे. त्यामुळे अतिरिक्त असलेल्या ऊसासाठी साधारणत: 1 रूपया टन कि.मी. याप्रमाणात हे अनुदान राहणार आहे. म्हणजे पहिल्या 50 कि.मी.ला काहीही अनुदान नाही. त्यापुढील प्रत्येक 25 कि.मी.साठी म्हणजे 51 ते 75 कि.मी.साठी 50 रूपये, 76 ते 100 कि.मी.साठी 75 रूपये, 101 ते 125 कि.मी.साठी 100 रूपये आणि 126 ते 150 कि.मी.पर्यंत 125 रूपये आणि 150 कि.मी.पेक्षा जास्ती अंतरासाठी 150 रूपये अनुदान हे शासनाकडून दिले जाणार आहे. तेव्हा अतिरिक्त ऊसाचे केलेले वाटप आणि उशीरापर्यंत गाळप करण्यासाठी दिले जाणारे अनुदान यामुळे उत्पादित झालेला सगळा ऊस संपेल असा प्राथमिक अंदाज आहे. सभापती महोदय, या वर्षी पाऊस थोडासा चांगला झाल्यामुळे ऊसाचे हेक्टरी उत्पादन वाढले आहे. सुरूवातीच्या अंदाजाप्रमाणे महाराष्ट्रात या वर्षी पाऊस चांगला झाल्याने 637 लाख मे.टन इतका ऊस उपलब्ध होईल असे वाटले होते पण तो जवळपास 100 लाख मे.टनाने वाढला आहे. त्यामुळे आता 637 लाख मे.टन ऊसाचे गाळप करावे लागणार आहे.

..... जे 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 28458 .....

या सर्व प्रयत्नांतून सरकारला खात्री आहे की, 30 मे पर्यंत राज्यातील सगळा ऊस संपेल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पॅकेजमध्ये समाविष्ट न झालेल्या साखर कारखान्यांना समाविष्ट करणे या संदर्भात अद्याप निर्णय झालेला नाही असे या उत्तरात म्हटले आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, पॅकेजमध्ये त्यांचा अंतर्भाव होण्यासाठी अटी कोणत्या होत्या ? त्यामध्ये त्यांना समाविष्ट का करण्यात आलेले नाही ? आणि शासन त्यांचा त्यात समावेश करण्याचा निर्णय केव्हा घेणार आहे तसेच गाळपाविना राहिलेल्या ऊसासाठी जे अनुदान दिले जाते, ते जुने सोडून नव्याने काही राहणार आहे का ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, पॅकेजमध्ये साधारणत: 92 कारखान्यांची शिफारस नाबार्डकडे केलेली होती. 92 कारखान्याना नाबार्डचे पॅकेजही मान्य झाले होते. त्यापैकी 13 कारखान्यांनी नाबार्डचे पॅकेज नको असे लिहून दिलेले आहे. बाकीच्यांच्या बाबतीत कारवाई चालू आहे. अजून जवळपास 15-16 कारखाने त्या पॅकेजमध्ये बसले नाहीत कारण 15 वर्षांचे पुनर्वसन कर्ज देऊन आणि त्याचे हप्ते बांधून देऊनही ते कर्ज फेडण्यास ते कारखाने पात्र नव्हते. कर्जाचा आकडा जास्त होता. त्यामुळे ते कारखाने राहिले होते. परंतु तरीही शासनाचा वारंवार प्रयत्न हा आहे की, ग्रामीण भागामध्ये हे कारखाने राहिले पाहिजेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, गाळपाअभावी राहिलेल्या ऊसाला किती अनुदान आपण देणार आहात ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, यापूर्वीही आपण अतिरिक्त ऊसाला अनुदान दिलेले आहे. तेव्हा त्याप्रमाणे अतिरिक्त ऊस राहिला तर त्यावेळेस त्यासाठी अनुदान देण्याचा जरूर शासन विचार करील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्य श्री.रावते यांच्या प्रश्नाला उत्तर देताना माननीय सहकार राज्यमंत्र्यांकडून असे सांगितले गेले की, नाबार्डकडून पॅकेज दिले गेले पण त्यात 15-16 कारखाने बसले नाहीत. तेव्हा जे कारखाने अशा प्रकारे त्या पॅकेजमध्ये बसणार नाहीत त्यांचा काही वेगळ्या पद्धतीने शासन विचार करणार काय ? आणि राज्यामध्ये जो प्रचंड प्रमाणात ऊस उभा आहे व एप्रिल पर्यंत त्या ऊसाचे गाळप झाले नाही तर अशा ऊसाला, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना काही अनुदान आपण देणार आहात का ? असल्यास, किती देणार ?

(यानंतर श्री. सरफरे ....के 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मी आता सांगितल्याप्रमाणे नाबार्डकडे पुन्हा एकदा शिफारस करण्यात येईल. आणि काही अटी शिथिल करता येतील काय यासंबंधी नाबार्डला विनंती करुन तो कारखाना सुरु होण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. त्याचप्रमाणे 30 एप्रिलपर्यंत व त्यानंतर 30 मेपर्यंत किंवा 180 दिवस कारखाना चालविण्याचे आदेश दिले आहेत. इतके दिवस कारखाना चालवून सुध्दा जर अतिरिक्त ऊस शिल्लक राहिला तर त्या शेतकऱ्यांना जरुर अनुदान दिले जाईल, त्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही.

श्री. वसंतराव चव्हाण : सभापती महोदय, ज्या कारखान्याकडे अतिरिक्त ऊस आहे तेथील ऊस दुसऱ्या कारखान्याकडे ट्रान्सपोर्टव्दारे वाहून नेण्याकरिता त्यांना शासन अनुदान देणार आहे काय?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सद्याच्या शासनाच्या वितरण आदेशाप्रमाणे अनुदान दिले जाणार आहे. परंतु माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जर केसेस असतील तर त्याची तपासणी करुन त्यासंबंधी योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, दिनांक 20.3.2007 रोजी माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख साहेबांच्या मतदारसंघामध्ये श्री. पुजारी नावाच्या शेतकऱ्याने आत्महत्त्या केली. माझ्या शेतामधील उभा ऊस घेतला जाईल की नाही या धास्तीने 35 वर्षाच्या या शेतकऱ्याने आत्महत्त्या केली. याठिकाणी मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर अतिशय मोघम स्वरुपाचे आहे. आज जर सरकार काही ठराविक रक्कम जाहीर करणार नसेल तर वर्तमानपत्रामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांच्या बातम्या छापून येणार नाही, त्याबरोबरच त्यांचे फोटो देखील छापून येतील. एवढी भयानक अवस्था ग्रामीण भागामध्ये निर्माण झाली आहे. मंत्रिमहोदयांना मला सरळ प्रश्न विचारावयाचा आहे की, गेल्या वर्षी आपण कांद्याचे ढीग पाहून कांद्याची नजर खरेदी केली त्याप्रमाणे ऊसाची खरेदी करणार काय? एका एकरामध्ये जर 35 टन ऊस उभा असेल तर त्याला 900 रुपये प्रति टन हमीभाव देऊन त्या भावाने हा ऊस खरेदी करण्यात येईल काय?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, याअगोदर सांगितल्याप्रमाणे सर्व ऊसाचे गाळप झाले पाहिजे यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. तरीसुध्दा जर काही ऊस शिल्लक राहिला तर काही प्रमाणामध्ये नुकसान भरपाई म्हणून अनुदान देण्याचा शासन जरुर विचार करील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 28458...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ऊसाच्या प्रश्नावर आपण अधिक वेळ दिल्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. माननीय सदस्यांनी ज्या शेतकऱ्याच्या नावाचा उल्लेख केला आहे त्या शेतकऱ्याच्या घरी मी जाऊन आलो आहे. आज मराठवाडयामध्ये अतिरिक्त ऊस शिल्लक राहिल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होऊ घातल्या आहेत.आपणास माहीत आहे की, तीन कारखाने लिजवर चालविण्यास घेतले आहेत. त्यापैकी पाथ्रीच्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये 4 लाख टन ऊस उभा आहे. हा कारखाना माननीय श्री. गोपीनाथ मुंडे साहेबांच्या बीड येथील वैजनाथ सहकारी साखर कारखान्याने चालविण्याकरिता घेतला. त्याकरिता पाच वर्षाचे ॲग्रिमेंट केले. दोन वर्षे कारखाना चालवून त्यांनी 6 कोटींचा नफा मिळवून दिला. परंतु एका एकी दोन कॉग्रेसमध्ये हा कारखाना चालवावयाचा कुणी या कारणावरुन भांडणे निर्माण झाल्यामुळे तो टर्मिनेट करण्यात आला. कोणत्या आमदारांच्या अधिपत्याखाली हा कारखाना चालवावयाचा या प्रश्नावरुन हा कारखाना तीन वर्षापासून बंद आहे. त्यामुळे त्या भागातील शेतकऱ्यांचा ऊस शेतामध्ये उभा आहे. तेथील शेतकरी आत्महत्त्या करु लागले आहेत. हा कारखाना गेल्या तीन वर्षामध्ये कां सुरु झाला नाही ? तो सुरु करण्याची शासनाची जबाबदारी असल्यामुळे त्या संदर्भात शासनाची काय भूमिका राहील? चालू असलेला कारखाना शासनाने बंद कां केला?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, पाथ्रीच्या कारखान्याच्या संदर्भात न्यायालयीन प्रकरण निर्माण झाले होते. हा प्रश्न वेगळा असल्यामुळे या संदर्भात अधिक माहिती घ्यावी लागेल. या कारखान्याची विक्री झाली होती, परंतु कारखाना खरेदी करणाऱ्याने वेळेमध्ये पैसे भरले नाहीत त्यामुळे विक्रीचा व्यवहार रद्द करण्यात आला. त्यामुळे ते प्रकरण न्यायालयामध्ये गेल्यामुळे तो कारखाना बंद झाला. कारखाना यावर्षी चालू करण्यासंबंधी शासन फेरविचार करील.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र.28458 (पुढे सुरु...

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, खरे तर आमच्या कारखान्यामध्ये देखील मराठवाड्याचा ऊस नेता येईल परंतु 150 कि.मी.पर्यन्तची अट घातल्यामुळे तो ऊस तेथे नेता येणार नाही. आमचा सहकारी साखर कारखाना वर्धा जिल्ह्याला लागून आहे. आमच्याकडील ऊसाचे गाळप संपलेले आहे. अंतर जास्त असले तरी शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांच्या ऊस घेऊन कारखाना चालवायला आम्ही तयार आहोत. तेव्हा 150 कि.मी.च्या अंतराची अट टाकलेली आहे ती अट शिथिल करुन वाढीव अंतरावरील ऊस नेण्यास परवानगी देणार आहात काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : 150 कि.मी. आणि त्यापेक्षा जास्त अंतर असले तरी ऊस घेता येतो.

श्री.दिवाकर रावते : शेतकऱ्यांना अनुदान देणार आहात काय ? या प्रश्नाचे उत्तर मंत्रीमहोदयांनी दिलेले नाही. आज शेतकऱ्यांच्या शेतामध्ये ऊस उभा आहे. शेतकरी आत्महत्येकडे वळू लागलेले आहे, त्यांचे जीवन उद्ध्वस्त झालेले आहे. माननीय मंत्रीमहोदय मराठवाड्यातील असून देखील मला याबाबतची माहिती घ्यावी लागेल असे म्हणत आहेत. आज शेतकरी मरणाच्या दारात उभा असताना सरकार काही करत नाही, याबद्दल आम्ही सरकारचा निषेध करुन सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ SBT/ KTG/

विसापूर, ता.तासगाव (जि.सांगली) येथील
शेतकऱ्यांना मोबदला मिळणेबाबत

(7) * 24873 प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील , श्री.कपिल पाटील : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील

काय :-

(1) विसापूर, ता.तासगाव (जि.सांगली) मधील आरफळ पाणी पुरवठा योजनेखाली जमीन गेलेल्या शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत मोबदला मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त योजनेखाली जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना कधीपर्यंत त्याचा मोबदला मिळणार आहे व त्याचे स्वरुप काय,

(3) मोबदला न देण्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामराजे नाईक निंबाळकर : (1) होय.

(2) शेतकऱ्याकडून संमतीने जमीनी ताब्यात घेतल्या असून भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. कलम 6 झाल्यानंतर भूसंपादन प्रकरणातील सर्व खातेदारांनी संमती दर्शविल्यास भूसंपादन अधिकारी 80 टक्के रक्कमेचे संमती निवाडा (Consent Award) करुन 80 टक्के रक्कमेचे वाटप करु शकतील व उर्वरित रक्कम अंतिम निवाडा घोषित होताच अदा करण्यात येईल.

(2) भूसंपादनाच्या मोबदल्याचे स्वरुप खालीलप्रमाणे -

जमीनीची किंमत, त्यामधील झाडे, विहिरी, ताली यांची किंमत व त्या रक्कमेवर 30 टक्के वाढीव मोबदला (Solitium) व कलम 4 पासून निवाडा जाहीर होईपर्यंत जमीन व वास्तूचे किंमतीवर 12 टक्के व्याज.

(3) भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

प्रा.शरद पाटील : विसापूर येथील शेतकऱ्यांच्या जमिनी आरफळ पाणीपुरवठा योजनेखाली गेलेल्या आहेत, त्या शेतकऱ्यांना भरपाई मिळणार आहे काय ? या संदर्भात उत्तर देताना "वस्तुस्थितीला धरून नाही, भूसंपादनाची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही", असे दिलेले आहे. सभापती महोदय, या मागचे खरे कारण शेतकऱ्यांच्या सात-बाराच्या उताऱ्यामध्ये आणि वहिवाट यामध्ये तफावत आहे. आणखी काही वर्षे गेली तरी भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण होणार नाही. सातबाराचा उतारा दुरुस्त केल्याशिवाय शेतकऱ्यांना भरपाई मिळू शकणार नाही. मंत्री महोदयांना प्रश्न विचारू इच्छितो की....

(बहिर्गमन केलेले सन्माननीय सदस्य सभागृहात प्रवेश करतात.)

सातबाराचा उतारा आणि वहिवाट दुरूस्त करण्यासंबंधीचे आदेश खालच्या अधिकाऱ्यांना देणार आहात काय ? सातबाराचा उतारा आणि वहिवाट दुरुस्त झाल्यानंतर शेतकऱ्यांना मोबदला मिळणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ SBT/ KTG/

ता.प्र.क्र.24873 (पुढे सुरु....

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : आरफळ योजना, तासगाव तालुक्यात आहे. हा प्रकल्प अे.आय.बी.पी.खाली तयार केलेला आहे. त्यामुळे अे.आय.बी.पी.चे शेवटचे वर्ष आहे. शेतकऱ्यांच्या कन्सेंटने जमीन ताब्यात घेतलेली आहे. कलम 6 खाली नोटीस निघत नाही तोपर्यन्त कन्सेंट अवॉर्ड करता येत नाही. सन्माननीय सदस्य श्री.शरद पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे पूर्वी झालेल्या स्टेटमेंटवर फाळणी क्षेत्र झाले. त्यानंतर सात-बाराचा उतारा तयार झाला. यामध्ये वैयक्तिक शेतकऱ्यांच्या क्षेत्रामध्ये तफावती आहेत. माननीय उपमुख्यमंत्री यांनी हा प्रश्न त्यांच्या मतदार संघातील असल्यामुळे दीड-दोन महिन्यापूर्वी स्वत: यासंबंधात बैठक घेतलेली होती. बैठकीमध्ये काही निर्णय झालेले आहेत. ही तफावत दूर करण्यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. आज सन्माननीय पुनर्वसन राज्यमंत्री स्वत: येथे उपस्थित आहे. ही तफावत दूर करण्यासाठी फाळणी क्षेत्र आणि सातबारा उतारा यामध्ये कोणत्या अडचणी निर्माण झालेल्या आहेत त्या संदर्भात क्षेत्रीय स्तरावर, त्यांचे स्टेटमेंट पाहून, सद्य:स्थिती पाहून त्यामध्ये राज्यपातळीवर हस्तक्षेप करण्याची आवश्यकता भासणार असेल तर पुनर्वसन राज्यमंत्री आणि मी स्वत: हस्तक्षेप करू व यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करू.

श्री.जयंत प्र.पाटील : किती शेतकऱ्यांची जमीन भूसंपादन करणार आहात ? त्याचे एकूण क्षेत्र किती आहे ? भूसंपादन करण्याचा निर्णय होईपर्यन्त त्या शेतकऱ्यांना 80 टक्के मोबदला देण्याचा निर्णय शासन घेईल काय ?

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 28458 .....

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, आता माझ्याकडे संख्येबाबत माहिती उपलब्ध नाही. परंतु ती माहिती घेऊन किती लोकांच्या जमिनी कन्सेंटने घेतलेल्या आहेत याची माहिती पटलावर ठेवण्यात येईल. तांत्रिक अडचण अशी आहे की, जोपर्यंत कलम 6 चे नोटिफिकेशन होत नाही तोपर्यंत त्यांना 80 टक्के रक्कम देता येत नाही. कलम 6 चे नोटिफिकेशन करण्याबाबत सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला की, जोपर्यंत फाळणी आणि सात-बारा या क्षेत्रातील तफावत रिकंसाईल होत नाही तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. यासंदर्भातील उत्तर मी आधीच दिलेले आहे.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, दोन्ही माननीय मंत्रिमहोदयांनी यामध्ये लक्ष घालून लवकरात लवकर रेकॉर्डमध्ये दुरुस्ती करुन घेण्यासंबंधीची कार्यवाही करावी अशी मी विनंती करतो.

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, मान्य आहे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/ KTG/ KGS

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

सहसचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 21 मार्च, 2007 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

सभापती : दिनांक 21 मार्च, 2007 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी)

.. 3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. इयत्ता दहावीच्या परीक्षेच्या बाबतीत गेले दोन तीन दिवस संपूर्ण महाराष्ट्रात आणि विशेषत: मुंबई परिसरामध्ये जो गोंधळ झाला त्याकडे मी या औचित्याच्या मुद्याव्दारे आपले लक्ष वेधू इच्छितो. यासंबंधात सभागृहात त्वरित निवेदन होणे आवश्यक आहे. गेल्या एक दोन वर्षापासून माध्यमिक शिक्षण मंडळाने पेपर सेट करण्याची नवीन पध्दत सुरु केली आहे. विद्यार्थ्यांनी कॉपी करु नये म्हणून ए, बी, सी, डी असे पेपरचे संच दिले जातात. त्याबाबत माझे काही म्हणणे नाही. परंतु सर्वसाधारणपणे जी डिफिकल्टी लेव्हल किंवा काठिण्य पातळी असते त्यामध्ये एका वर्गात चार मुले असतील तर त्यांना त्या ठिकाणी वेगळे संच द्यावेत व अंक बदलून प्रश्न देण्यात यावेत. भूमिती आणि बीजगणिताच्या पेपरच्या बाबतीत दोन तीन ठिकाणी तर विद्यार्थी आणि पालक यांच्यामध्ये अत्यंत असंतोष निर्माण झाला. त्यामुळे प्रक्षोभ निर्माण झाला. यासंबंधी पालकांनी तक्रार केल्यानंतर सुध्दा त्याची कोणतीही दखल घेतली गेली नाही. त्यानंतर इतिहास या विषयासंबंधी वेगळाच प्रश्न विचारला गेला. जे अमराठी भाषिक विद्यार्थी असतील त्यांना लोअर लेव्हल मराठी विषयाच्या पेपरमध्ये निबंधाचे विषय "चांदण्या रात्रीचे सौंदर्य", "रुपया बोलू लागला तर", "अंधश्रध्दा- समज-गैरसमज" असे देण्यात आले होते. मुंबईमध्ये इयत्ता दहावीच्या परीक्षेमध्ये विशेषत: बीजगणित आणि भूमितीच्या संबंधात विद्यार्थी आणि पालक यांच्यामध्ये अतिशय असंतोष निर्माण झालेला आहे. नैसर्गिक न्यायाच्या विरोधात अशा प्रकारच्या प्रश्नपत्रिका काढल्या गेल्या. त्यामुळे शासनाने यासंबंधी त्वरित निवेदन करणे आवश्यक आहे. काही विद्यार्थी आत्महत्या करण्याची शक्यता आहे. काही विद्यार्थी दुसऱ्या दिवशी घाबरुन परीक्षेला बसले नाहीत. मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, याबाबतीत शासनाने निवेदन करावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, इयत्ता दहावीच्या परीक्षेचे अजून काही पेपर शिल्लक असल्यामुळे विद्यार्थ्यांना मानसिक रिलीफ मिळण्यासाठी शासनाकडून आजच ठोस घोषणा होणे आवश्यक आहे. हा प्रश्न फार ज्वलंत आहे. बरेच पालक मला म्हणाले की, आम्ही आपल्याला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

भेटावयास येतो. मी त्यांना सांगितले की, आज मला कोर्टात एका साक्षीसाठी जावयाचे असल्यामुळे तुम्ही उद्या सकाळी 8.00 वाजता या. सकाळी 8.00 वाजता साडेसातशे पालक पार्ल्याला माझ्या घरी आले. एवढी तीव्र चिंता विद्यार्थी आणि पालकांमध्ये आहे. त्यामुळे आपण माननीय शिक्षण मंत्र्यांना बोलवून घ्यावे. याबाबत कोणती ठोस उपाययोजना करणार हे सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. यासंदर्भात काही शाळांच्या सिनियर प्राचार्यांनी सुचविलेल्या पर्यायांवर विचार केला तर विद्यार्थ्यांना आजच्या आज रिलीफ मिळेल आणि ते करणे आवश्यक आहे. आपण माननीय मंत्रिमहोदयांना आपल्या दालनात बोलवून आजच निवेदन करण्यास सांगावे अशी माझी नम्र विनंती आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सकाळी सन्माननीय सदस्य श्री. तावडे यांच्याकडे काही पालक आले होते तेव्हा माझेही त्यांच्याशी फोनवरुन बोलणे झाले. मी दोन स्पेफिफिक मुद्दे मांडतो. पहिला मुद्दा असा की, सिलॅबसच्या बाहेरचे प्रश्न विचारण्यात आले आणि दुसरा मुद्दा असा की, काठिण्य पातळी ओलांडली गेली. गणितामध्ये ए, बी, सी, डी असे पेपर देण्यात येतात.

यानंतर कु. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ...

ए व डी सेट मधील प्रश्न सोपे होते तर बी व सी सेट मधील दोन प्रश्न हे सिलॅबसच्या बाहेरील होते. हे दोन्ही प्रश्न अतिशय कठीण होते. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान होणार आहे. या प्रकारामुळे पालकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. त्याकडे सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सभागृहाचे लक्ष वेधले आहे. या विद्यार्थ्यांना अजूनही उर्वरित पेपर द्यावयाचे आहेत. त्यांच्यावर परीक्षेचा तणाव आहे. म्हणून झाल्या प्रकरणी उपाययोजना करावी अशी मी शासनाला विनंती करीत आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी योग्य मुद्दे मांडले आहेत. या पेपरसेटमुळे विद्यार्थी आणि पालकांचा मानसिक छळ झाला ही गोष्ट खरी आहे. त्यामुळे पालक व विद्यार्थी एकत्र कोर्टात जाण्याच्या तयारीत आहेत. यंदाच्या बारावीच्या आय.टी.पेपरच्या वेळी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. या पेपरमध्ये लॉगईन करण्यासाठी दोन तासांचा अवघी लागला. अशा प्रकारांमुळे विद्यार्थी आणि पालक अतिशय अस्वस्थ आहेत. जर शासनाकडे योग्य प्रकारची यंत्रसामुग्री नसेल तर ऑन लाईन पेपर घेण्याचे कारण काय? म्हणून दहावी आणि बारावीच्या परीक्षेसंदर्भात निर्माण झालेल्या गोंधळाच्या वातावरणासंबंधी शासनाने निवेदन करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या परीक्षांचे पेपर कसे काढावयाचे हे सभागृहाने ठरविणे योग्य होणार नाही.

सभापती : मी प्रत्येक सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करण्यासाठी अर्धा मिनीट वेळ देणार आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर मुद्दा आहे बीजगणित, भूमिती या प्रश्नपत्रिकेच्या संचामध्ये काही फरक झालेला आहे त्यामुळे विद्यार्थ्यामध्ये 2 भाग पडतील . काहींना त्याचा फायदा होईल तर काहीना त्याचा तोटा होईल. अशा पध्दतीने आपण परीक्षा घेतल्यास विद्यार्थ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान होईल. तेव्हा याबाबत सभागृहात आजच निवेदन झाले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KGS/ KTG/

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, बीजगणिताच्या प्रश्नपत्रिकेपाठोपाठ भूमितीच्या संचाची प्रश्नपत्रिका कठीण येण्याची पुनरावृत्ती झालेली आहे. बीजगणित आणि भूमिती या बहु संची पश्ननत्रिकेतील बी आणि सी संचामधील प्रश्नपत्रिका कठीण होत्या. अशा प्रकारामुळे खेडयातील मुलांना वारंवार अडचणी निर्माण होतात त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास ढासळलेला आहे. सभागृहाला जरी या बाबतीत कुठलाही निर्णय घेण्याचा अधिकार नसला तरीही या मुलांच्या भावी आयुष्याचा विचार करुन बहुसंची प्रश्नपत्रिकेतील बी आणि सी संचाबाबत विचार होणे आवश्यक आहे. माझ्या मते ज्या विद्यार्थ्यांनी बी आणि सी संचामधील प्रश्नपत्रिका सोडविल्या असतील अशा विद्यार्थ्यांना आपण ग्रेस मार्क्स दिले पाहिजेत.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, वेगवेगळया प्रश्नपत्रिकेचा विषय, कॉपी पुरविण्याचा विषय, नियमापेक्षा अधिक वेळ देण्याचा विषय या सगळया विषयाबाबत ज्वलंत प्रश्न निर्माण झालेले आहेत. येथे अनेक सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळे मुद्दे मांडलेले आहेत. याबाबत शासनाने निवेद**न** करावे अशी मी विनंती करतो.

सभापती : या औचित्याच्या मुद्दयावर या सदनातील एका पेक्षा अधिक सन्माननीय सदस्यांना बोलण्याची मी परवानगी दिलेली आहे. काही वृत्तपत्रामध्ये सुध्दा या वर अत्यंत प्रतिकूल पद्धतीने बातम्या आलेल्या आहेत. या सदनातील अनेक सन्माननीय सदस्यांनी औचित्याच्या मुद्दयाद्वारे सदर प्रश्न मांडण्याची माझ्याकडे विनंती केली होती. त्यामुळे मी 5-6 सन्माननीय सदस्यांना विशेष बाब म्हणून बोलण्याची परवानगी दिली. हे विद्यार्थी उद्याची तरुण पिढी आहे. अशा या पिढीवर आघात करणारी बाब असेल तर त्या बाबत उच्च प्राथमिक शिक्षण विभागाच्या सन्माननीय मंत्र्यांनी आज अगर उद्या सविस्तर निवेदन करावे. विद्यार्थ्यांचे नुकसान न होता त्यांची कशी काळजी घेता येईल या बाबीचा विचार सुध्दा शासनातर्फे करण्यात येणाऱ्या निवेदनात समाविष्ट करण्यात यावा.

यानंतर श्री. एम. शिगम .....

अशुधीत प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, हा विषय शालेय शिक्षण विभागाशी संबंधित असल्याने मी सन्माननीय मंत्री महोदयांना सभागृहामध्ये पाचारण करण्याची विनंती केलेली आहे. तरी दरम्यानच्या काळात शासनाच्यावतीने मी सांगू इच्छितो की, या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदयांशी तसेच मंडळाचे चेअरमन आणि पदाधिका-यांशी बोलून आज किंवा उद्या सभागृहामध्ये निवेदन करण्यात येईल.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त व सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी एकाच विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याची परवानगी मागितली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मला विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यास परवानगी मिळालेली आहे. मी विशेष उल्लेखाची सूचना मांडीन.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. इगतपुरी नाशिक येथील गडगड सांगवी जवळील आमली धारगड या डोंगरावरील गुहेत 5 ते 6 वयाच्या लहान मुलांची हातापायाचे आणि कवटीचा समावेश नसलेली असंख्य हाडे सापडल्याची घटना दिनांक 7 मार्च 2007 रोजी उघडकीस आली आहे. या घटनेमुळे गुप्त धनासाठी नरबळीचा प्रकार घडला असल्याची संतप्त चर्चा नाशिक परिसरात सुरु झाली आहे. परिणामी महाराष्ट्रातील निठारी नाशकात अशी प्रतिक्रिया जनतेत उमटून प्रचंड भीतीचे वातावरण पसरलेले आहे. तेव्हा सार्वजनिक दृष्टीने अत्यंत महत्वाच्या आणि तातडीच्या विषयाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. राणा जगजितसिंह पाटील (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन 2006-2007 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन 2006-2007 सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री. अरविंद सावंत (समिती सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 23 मार्च, 2007 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणा-या अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 22 मार्च, 2007 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. सदर वेळ खालीलप्रमाणे ठरावांना देण्यात यावा, अशी शिफारस समितीने केली आहे.

(1) ठराव क्रमांक 81- श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स., 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(2) ठराव क्रमांक 127 - श्रीमती उषाताई दराडे, वि.प.स., 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(3) ठराव क्रमांक 50 - डॉ. नीलम गो-हे, वि.प.स., 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांकाच्या ठरावास देण्यात यावा अशीही शिफारस समितीने केली आहे.

सभापती : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री. अरविंद सावंत : महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वयेच्या सूचनांसंबंधी

सभापती : आज सन्माननीय सदस्यांकडून महाराष्ट्र विधानपरिषद नियम 93 अन्वये एकूण 22 सूचना मला प्राप्त झालेल्या आहेत. या संदर्भात मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देत आहे की, आज दुपारी 2.00 वाजता माननीय राज्यपालांनी दिलेल्या वेळेनुसार व संविधानाच्या तरतुदीनुसार माननीय वित्तमंत्री सन 2007-2008 या वर्षाचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करणार आहेत. त्यामुळे नियम 93 अन्वये दिलेल्या सूचना आज घेतल्या जाणार नाहीत. या सूचना मी उद्या घेईन.

....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नागपूरमधील कार्गो हब प्रकल्पाकरीता अधिग्रहित करण्यात आलेल्या जमिनीस वाढीव मोबदला मिळणे.

मु.शी.: नागपूरमधील कार्गो हब प्रकल्पाकरीता अधिग्रहित करण्यात आलेल्या जमिनीस वाढीव मोबदला मिळणे यासंबंधी सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सागर मेघे (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो :-

"नागपूरात होऊ घातलेल्या कार्गो हब प्रकल्पाच्या बायोटेक पार्कसाठी आणखी जमीन अधिग्रहित करण्यात येईल, अशी माहिती एमआयडीसीचे उपाध्यक्ष यांनी नागपूरात 25.फेब्रुवारी, 2007 रोजी देणे, शेतकऱ्यांमध्ये याबाबत संभ्रमाचे व भितीचे वातावरण निर्माण होणे, कार्गो हब प्रकल्पाकरिता संपादित जमिनीच्या व पुनर्वसनासाठी माहे डिसेंबर, 2006 मध्ये स्थापित समितीने अवधी संपुनही आपला रिपोर्ट सादर न करणे, पुनर्वसनाची कोणतीही योजना शासनाकडे तयार नसणे, जमिनीचा मोबदला वाढवून देण्याची गरज, शिवणगांव येथील उर्वरित खातेदारांना अद्यापही मोबदला न मिळणे, यामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत नाजुक होणे, गत हिवाळी अधिवेशनाच्या दरम्यान शिवणगांव येथील नागरिकांनी आत्मदहनाचा केलेला प्रयत्न, पुनर्वसनाची योजना तयार न करणे, जमिनीचा भाव वाढवून न देणे, याकडे शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना".

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.1.....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, नागपूरमध्ये अतिशय महत्वाचा आंतरराष्ट्रीय कार्गो हब प्रकल्प उभारण्यासाठी 1994 साली जमीन अधिग्रहित करण्यात आली. त्याचा प्रत्यक्षात अवॉर्ड 1994 ला झाला आणि पैसे 1996 ला दिले गेले. तांत्रिक चुकांमुळे कोर्टामध्ये जाऊन 1994 च्या दरानुसार किंमत घ्यावी लागत आहे. आज तेथे एकरी 1 लाख रुपये दराने घेतलेली जमीन 50 ते 60 लाख रुपये एकरी या दराने विकली जात आहे. प्रकल्पग्रस्तांना एक्स-ग्रेशिया पेमेंट म्हणून प्रत्यक्ष त्यावेळचा जमिनीचा मोबदला देण्यात येईल का? सरकारने निर्णय घेतला आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले. त्याप्रमाणे समिती तयार झाली. या प्रकल्पाला 1999 च्या पुनर्वसन अधिनियमाच्या कलम 2(10) च्या तरतुदी विचारात घेऊन हा अधिनियम या प्रकल्पाच्या पुनर्वसन कामासाठी लागू करण्यात आला आहे का? माझ्याकडे शासनाचे पत्र आलेले आहे, त्यामध्ये लागू करण्यात आल्याचे म्हटले आहे. या अधिनियमाप्रमाणे मिळणाऱ्या सर्व सवलती येथील शेतकऱ्यांना मिळतील का? ज्या जमिनी घेतल्या जातात, त्यामध्ये अस्तित्वातील घरे संपादित केली, त्यांच्या बाबतीत as per the replacement cost धरली जात नाही. ती कॉस्ट धरली पाहिजे. घरे उद्ध्वस्त होतात, त्यांना दुसरीकडे पुनर्वसित करीत असताना 40 हजार रुपयांचा मोबदला दिला जातो, परंतु प्रत्यक्षात घर घेण्यासाठी 4 लाख रुपये खर्च येतो. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांवर बेघर होण्याची पाळी येते. त्यांना replacement cost दिली जाईल का?

श्री.राजेश टोपे : मिहान हा निश्चितच नागपूर आणि विदर्भाच्या दृष्टीने महत्वाचा असलेला प्रकल्प आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी तीन प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामध्ये एक्स-ग्रेशिया रक्कम देणार का हा पहिला प्रश्न आहे. या संदर्भात सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.बावनकुळे यांनी डिसेंबर, 2006 च्या अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला होता. मी सभागृहात उत्तर देत असताना एक समिती गठीत करण्यात येईल असे सांगितले होते. त्याप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे. परंतु जिल्हा परिषदा आणि महानगरपालिकांच्या निवडणूक आचारसंहितेमुळे या समितीच्या बैठका घेण्यात आलेल्या नव्हत्या.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3.

लक्षवेधी सूचना क्र.1....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सरकारने नवीन घोषणा करु नयेत याकरीता आचारसंहिता आहे. बैठका घेण्यासाठी आचारसंहिता लागू आहे असे म्हटलेले नाही. या समितीच्या सन्माननीय सदस्यांना आचारसंहितेच्या काळात बैठका घ्यायला कोणती अडचण होती? निर्णय जाहीर करण्यास आचारसंहिता लागू होती. शासनाने सभागृहात कबूल करुनही 3 महिन्यात एकही बैठक घेतली नाही. दोषावर आचारसंहितेचे पांघरुण का घालता?

श्री.राजेश टोपे : या समितीमध्ये नागपूरचे जिल्हाधिकारी, नागपूरचे विभागीय आयुक्त या सन्माननीय सदस्यांचा समावेश आहे.

सभापती : मंत्रीमहोदय, हरकतीच्या प्रश्नासंबंधी मी सांगेन की, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेली हरकत योग्य आहे. आचारसंहितेच्या अनुषंगाने धोरणांच्या संदर्भात आपण जाहीर करु शकत नाही. परंतु अनौपचारिक व औपचारिक बैठका घेता येतील. ती continuous process आहे.

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आणि वस्तुस्थिती मी मान्य करीत आहे. देऊन या बैठकीचे महत्व आणि प्रकल्पाचे महत्व, शेतकऱ्यांचे महत्व यांना प्राधान्य देऊन बैठका होणे आवश्यक होते, परंतु तसे घडले नाही. हे चुकीचे आहे. या संदर्भात एवढीच खात्री देतो की, या भूसंपादनाची रक्कम किंवा एक्स-ग्रेशिया देण्याच्या संदर्भात ही समिती निर्णय घेणार आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

त्यामुळे यासंदर्भातील बैठक येत्या एक महिन्याच्या आत घेऊन निर्णय घेण्याच्या संदर्भात निश्चितपणे प्रयत्न करण्यात येतील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात दोन महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आदेश दिले होते. परंतु आचारसंहितेचे कारण सांगून यासंदर्भातील बैठक तीन महिने झाले तरी माननीय मंत्रीमहोदय घेत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, स्थानिक आमदार सुध्दा या समितीचे सदस्य आहेत. या समितीची बैठक आयोजित करण्यास उशीर झालेला आहे, ही वस्तुस्थिती आहे. एक महिन्याच्या आत यासंदर्भात आम्ही निश्चितपणे निर्णय घेऊ. आंतरराज्य प्रकल्प व बाहय सहाय्य प्रकल्पांना पुनर्वसनाचा कायदा लागू होत नाही. तरीसुध्दा यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केल्याप्रमाणे मदत करण्यात येणार आहे. कोणत्याही परिस्थितीत पुनर्वसन कायद्याच्या तरतूदीचा 100 टक्के फायदा या प्रकल्पग्रस्तांना देण्यात येईल आणि पुनर्वसन कायद्याच्या जेवढया काही तरतुदी आहेत त्या सर्व तरतुदी या प्रकल्पासाठी लागू करण्यात येतील. यासंदर्भात पुनर्वसन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली असून ही समिती याबाबत निर्णय घेणार आहे. या प्रकरणाची फाईल माननीय पुनर्वसन मंत्र्यांकडे प्रलंबित असून कोणत्याही परिस्थितीत 15 ते 20 दिवसात निर्णय घेऊन "मिहान" प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन कायदा लागू करण्यात येईल. या प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्क्यांची योजना किंवा पुनर्वसन कायद्यात शेतक-यांसाठी जी तरतूद आहे ती या ठिकाणी लागू करण्याच्या संदर्भात निश्चितपणे लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, रेकॉर्डवर सत्य माहिती यावी यासाठी मी काही मुद्दे उपस्थित करीत आहे. याविषयीचे महसूल व वन विभागाचे पत्र माझ्याकडे असून ते मी या ठिकाणी वाचून दाखवितो.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

क्रमांक - आरपीए-2004/644/प्र.क्र.29/र
महसूल व वन विभाग.
मंत्रालय, मुंबई-32

प्रति,

विभागीय आयुक्त, नागपूर.

विषय : नागपूर येथे आंतरराष्ट्रीय पॅसेंजर व एअरपोर्ट (कार्गोहब) सिकसित करणे.

संदर्भ : 1) आपले पत्र क्र. अका/पुनर्वसन/कावि-743/2002 दि. 30.11.2002.

2) आपले पत्र क्र. अका / पुनर्वसन / कार्गोहब / क.वि.414/04. दि.17.8.2004.

महोदय,

संदर्भाधीन पत्राचे अवलोकन करावे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्याचे मला निदेश आहेत की, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, 1999 च्या कलम 2(10) च्या तरतुदी विचारात घेता कार्गोहब प्रकल्पास सदर अधिनियम लागू होतो. त्यानुसार या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम लागू करुन अधिनियमातील तरतुदीनुसार पुनर्वसन करणे आवश्यक राहिल व पुनर्वसन अधिनियमाच्या 1(4) (ब) नुसार या प्रकल्पामुळे बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी प्रकल्प हाती घेणा-या संबंधित प्राधिकरण प्रशासकीय विभागाची असेल

आपला

(आ.प्र. रणदिवे)
महसूल व वन विभाग

सभापती महोदय, हा माझा ड्रीम प्रोजेक्ट आहे. त्यामुळे या प्रकल्पाला मी बिलकुल अडचण निर्माण करु शकणार नाही. या प्रकल्पामधील प्रकल्पबाधित शेतक-यांना फायदा व्हावा, हा माझा हेतू आहे. या प्रकल्पबाधित शेतक-यांना जे देय आहे, ते मिळालेच पाहिजे. आपण या प्रकल्पाच्या संदर्भात घरे ॲक्वायर केलेली आहेत त्यामुळे या लोकांना पूर्ण रिप्लेसमेंट मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे या

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

प्रकल्पग्रस्त लोकांच्या घरांना रिप्लेसमेंट कॉस्ट दिली जाणार आहे का? आपण यासंदर्भात जी काही कमिटी स्थापन केलेली आहे त्या कमिटीमध्यें आम्हाला बोलावले तर आम्ही सुध्दा उपस्थित राहू. यासंदर्भात आपल्याला जर नवीन जागा हवी असेल तर नवीन जागा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सुध्दा आम्ही प्रयत्न करु. कारण यासंदर्भात शासनाकडे जागा उपलब्ध आहे. या ठिकाणी खापरीतील 65 घरे तशीच ठेवलेली आहेत, ते काही बरोबर नाही. त्यामुळे या 65 घरांचा सुध्दा यामध्ये समावेश करण्यात यावा. तसेच घरांना रिप्लेसमेंट कॉस्ट देण्यात यावी. नियमाप्रमाणे घरांच्या किंमती लावाव्यात व प्रकल्प ग्रस्तांना न्याय द्यावा एवढी विनंती आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, घरांना रिप्लेसमेंट कॉस्ट देण्याच्या संदर्भात शासन निश्चितपणे विचार करील. पूर्वी जी घरे बांधलेली आहेत व आता जी घरे बांधावी लागणार आहेत त्याच्या किंमतीत निश्चितपणे फरक पडणार आहे. त्यामुळे रिप्लेसमेंट कॉस्टचा निश्चित प्रकारे विचार करण्यात येईल.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, निवेदनात म्हटले आहे की, "मिहान प्रकल्पांतर्गत बाधित सर्व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव पुनर्वसन प्राधिकरणाकडे विचारार्थ सादर करण्यात आला आहे. पुनर्वसन प्राधिकरणाचे अभिप्राय विचारात घेऊन योग्य त्या सूचना महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस आवश्यक कार्यवाहीसाठी देण्यात येतील." माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव केव्हा पाठविण्यात आला ? पुनर्वसन प्राधिकरणाकडून विमानतळ विकास कंपनीस केव्हा प्रस्ताव प्राप्त झाला ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मागील आठवड्यात पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. येत्या 10-15 दिवसांच्या आत प्राधिकरणाकडून निर्णय घेण्यात येईल. पुनवर्सनासंदर्भात शासनाची भूमिका 100 टक्के सकारात्मक राहील.

श्री.सागर मेधे : सभापती महोदय, मिहान प्रकल्पांतर्गत ज्यांची घरे जातील त्यांच्या बाबतीत रिप्लेसमेंट कॉस्ट लावण्यात येणार की, डेप्रिसिएशन कॉस्ट लावण्यात येणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, याच संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी प्रश्न विचारला होता. त्या संदर्भात उत्तर देताना मी सांगितले होते की, सन्माननीय सदस्यांचा मुद्दा रास्त असल्यामुळे रिप्लेसमेंट कॉस्ट बाबत जरुर विचार करु.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, नागपूर येथे मिहान प्रकल्प होत आहे ही अतिशय चांगली गोष्ट आहे यात दुमत नाही. सध्या नागपूर येथील प्राईड हॉटेलपासून ते अगदी बुटीबोरी भागापर्यंतच्या 28 कि.मी.च्या परिसरातील शेतकऱ्यांची धावपळ सुरु झालेली आहे. मिहान प्रकल्पासोबत व्ही.सी.ए. प्रकल्पासाठीसुध्दा 100-200 एकर जमीन संपादित करणार असल्याची त्याठिकाणी वदंता आहे. तसेच कार्गो हब प्रकल्पाच्या बायोटेक पार्कसाठी आणखी जमीन संपादित करण्यात येणार असल्याचे समजल्यामुळे त्याठिकाणी 1 लाख रुपयांपासून 50 लाख रुपयांपर्यंत जमिनींची उलाढाल झालेली आहे. त्यामुळे तेथील शेतकरी संभ्रमावस्थेत आहेत. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, "मिहान"प्रकल्पासाठी व व्ही.सी.ए.साठी किती एकर जागा आरक्षित करण्यात आलेली आहे ? तसेच नागपूरमध्ये आणखी कोणकोणते प्रोजेक्ट हाती घेण्यात येणार आहेत ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मिहान प्रकल्पासाठी एकूण 4 हजार 311 हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. तसेच मिहान प्रकल्पांर्गत बायोटेक आणि फार्मास्युटीकल पार्क प्रकल्पासाठी 850 एकर नवीन जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे. तशा आशयाचा प्रस्ताव एम.ए.डी.सी.ने शासनाकडे पाठविला आहे. या प्रस्तावावर शासनाने अजून निर्णय घेतलेला नाही. या संदर्भात स्क्रुटीनी करुन शासन निर्णय घेणार आहे.

सभापती : आज दुपारी 2.00 वाजता अर्थसंकल्प सादर होणार असल्यामुळे आजच्या कामकाजपत्रिकेतील उर्वरित तीन लक्षवेधी सूचना आज चर्चेसाठी न घेता त्या नंतर घेण्यात येतील.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>माध्यमिक शालांत परीक्षेच्या बीजगणिताच्या प्रश्नपत्रिकेबाबत</u>

सभापती : आज सहा-सात सन्माननीय सदस्यांनी औचित्याच्या मुद्दाच्या माध्यमातून सध्या सुरु असलेल्या माध्यमिक शालांत परीक्षेत बीजगणित आणि भूमिती या विषयांचे पेपर्स कठीण काढल्या संदर्भात शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशाप्रकारे काढण्यात आलेल्या कठीण पेपर्समुळे विद्यार्थ्यांवर होणारा संभाव्य परिणाम याचा विचार करुन शिक्षण मंत्र्यांनी शिक्षण मंडळास योग्य त्या सूचना द्याव्यात. तसेच या संदर्भातील सविस्तर निवेदन आज दिवसभरात किंवा उद्या करावे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, निवेदन करण्यात येईल.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, उर्वरित लक्षवेधी सूचनाही अग्रक्रमाने घ्याव्यात.

सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, कुठल्याही प्रकारची लक्षवेधी सूचना मी कधीही रद्द केलेली नाही. उर्वरित लक्षवेधी सूचनाही घेण्यात येतील. तसेच, विशेष उल्लेखाच्या ज्या सूचना आहेत, त्या उद्या घेण्यात येतील.

आता मी सभागृहाचे कामकाज तहकूब करतो. सभागृहाचे कामकाज पुन्हा दुपारी 2.00 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक 1 वाजून 45 मिनिटांनी, 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: सन 2007-2008 चा अर्थसंकल्प सादर करणे

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2007-2008 चा अर्थसंकल्प मी सभागृहाला सादर करीत आहे.

(प्रेस : सोबतचे भाषण छापावे.)

यानंतर कु.जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय अर्थ राज्यमंत्री डॉ.सुनिल देशमुख यांचे भाषण पुढे सुरु.....)

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ KTG/ KGS/ SBT/ प्रथम कु.खर्चे 14:10

डॉ.सुनील देशमुख पुढे सुरु.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनिल देशमुख यांचे भाषण..... (पुढे सुरु)

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-03-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही)Y 1

DGS/ SBT/ MAP/ 14:25

मा. अर्थमंत्री डॉ. सुनील देशमुख यांचे भाषण ..... पुढे चालू...

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय अर्थराज्यमंत्री महोदयांचे भाषण पुढे सुरु.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले

यानंतर कु. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय वित्त राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांचे भाषण पुढे सुरु....)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय अर्थ राज्यमंत्र्यांचे भाषण पुढे सुरु....)

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-03-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही)DD.1

SGB/ MAP/ SBT/ 14:50

(माननीय अर्थ राज्यमंत्र्यांचे भाषण पुढे सुरु.....)

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय अर्थ राज्यमंत्र्यांचे भाषण पुढे सुरु.....)

यानंतर श्री. पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय अर्थ राज्यमंत्र्यांचे भाषण पुढे सुरु...)

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन 2007-2008 चा अर्थसंकल्प सभागृहाला सादर झाला आहे. या अर्थसंकल्पाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना देण्याची व्यवस्था वित्त विभागातर्फे विधानभवन येथील तळमजल्यावरील वितरण केंद्रात करण्यात आली आहे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>माध्यमिक शालांत परीक्षेच्या बीजगणिताच्या प्रश्नपत्रिकेबाबत</u>

सभापती : माननीय शालेय शिक्षणमंत्री, प्रा.वसंत पुरके सभागृहात उपस्थित आहेत. त्यांच्या मी हे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, माध्यमिक शालांत परीक्षेच्या बीजगणिताच्या प्रश्नपत्रिकेसंबंधी आज संध्याकाळपर्यन्त किंवा कामकाज संपेपर्यन्त माननीय मंत्रीमहोदयांनी सभागृहात निवेदन करावे, असे मी निदेश दिले होते.

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षणमंत्री): सभापती महोदय, याविषयी एक अभ्यासगट स्थापन करण्यात आला असून या अभ्यासगटाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे याविषयीचे निवेदन उद्या सभागृहात करण्यात येईल.

सभापती : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या, शुक्रवार, दिनांक 23 मार्च 2007 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 12 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 23 मार्च 2007 च्या दुपारी 12 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही